. ग्रं. सं. ठाणे
निबंध
१३८९




REFBK-0011490

# र्श विद्यार्थी

वि. वा. जोशी

# आदर्श विद्यार्थी

: लेखक :

वि. वा. जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलमत.
अनुक्रम 32293 वि:
क्रमांक नों दि:
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
वा. क्र. 11850
संग्रह शाखा
REFBK-0011490

स्कूल अॅण्ड कॉलेज बुकस्टॉल
गुजरी नाका : कोल्हापूर

: प्रकाशक :

दा. ना. मोघे, बी. ए.

स्कूल अँड कॉलेज बुकस्टॉल,

कोल्हापूर

◆

प्रथमावृत्ति : नोव्हेंबर १९६१

◆

सर्व हक्क स्वाधीन

◆

किंमत १ रु या

◆

: मुद्रक :

चि. पां. मोडक

समन्वय मुद्रणालय पुणें २.

## हृद्गत

शालेय जीवनांत अभ्यासक्रमाबरोबर विविध ज्ञानाची ( General Knowledge) अत्यंत आवश्यकता आहे व तदनुसार नव्या अभ्यासक्रम पद्धतींत प्रस्तुत विषयाचा समावेश करण्यांत आलेला आहे, पण तो परिपूर्ण नाहीं.

विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांचा परस्परांशी प्रत्यहीं येणारा संबंध आणि त्यांच्या जीवनाशी आणि व्यवहाराशी निगडीत असलेले अनेक प्रश्न यांचा इष्ट दिशेनें वापर होऊन त्यांतील आवश्यक गोष्टी जोंवर विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यांत येत नाहींत, तोंवर तरी ते अपरिपक्वच राहणार.

'आदर्श विद्यार्थी' या प्रस्तुतच्या छोटयाशा पुस्तकांत त्या दृष्टीनें विचार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विद्यार्थ्यांचें क्षेत्र, घर, शाळा, आणि बाह्यजग (Outer world) यांत सामावलेले विविध प्रश्न व त्याबरोबरच त्यांना हवे असणारे गुरूजन आणि पालकांचे मार्गदर्शन किती अगत्याचे आहे याचा एका विशिष्ट पद्धतीनें उहापोह केलेला आढळून येईल. रोजनिशी, वाचनालये, पत्राने मैत्री, प्रवास इत्यादि गोष्टींची गोडी आणि संवय त्यांना अगदीं सुरूवातीपासून लागल्यास त्यांच्या भावी आयुष्यांत त्याचा फार उपयोग होईल.

विद्यार्थी–जीवनविकासाच्या दृष्टीनें केलेला हा अल्प प्रयत्न सर्वांना तसाच शाळाधिकाऱ्यांना आवडला तरी लेखकाच्या श्रमाचे चीज झालें असे म्हणतां येईल.

प्रस्तुत लेख, विदर्भांत निव्वळ शैक्षणिक विषयांस वाहून घेतलेल्या "सेवक" या त्रैमासिकांतून यथास्थळ प्रसिद्ध झाले आहेत. सदर मासिकाच्या चालकांच्या सौजन्यानें हे लेख आज स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत आहेत. सेवकच्या ऋणनिर्देशाप्रमाणेंच प्रकाशक श्री. दा. ना. मोघे यांचाहि निर्देश करणें मी अगत्याचें समजतों.

चांदा ( महाराष्ट्र राज्य ) — वि. वा. जोशी

दीपावली १९६१

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | मुलांचें व्यावहारिकज्ञान आणि पालक ... | १ |
| २. | मुलें आणि शिस्त ... ... ... | ५ |
| ३. | मुलांचें गृहराज्य ... ... ... | १० |
| ४. | मुलें आणि वाचनालयें ... ... ... | १५ |
| ५. | शालेय स्नेहसंमेलनासंबंधीं ... ... ... | २० |
| ६. | मुलें आणि रोजनिशी ... ... ... | २६ |
| ७. | मी व माझे गुरुजन ... ... ... | ३० |
| ८. | विद्यार्थीजीवन व पत्रानें मैत्री ... ... | ३६ |
| ९. | आदर्श विद्यार्थ्याची अभ्यासिका ... ... | ४२ |
| १०. | विद्यार्थी व प्रवासांतील वैशिष्टचें ... ... | ४७ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११४८०
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 32293
क्रमांक 1329

# १ : मुलांचें व्यावहारिक ज्ञान आणि पालक

◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆ ◆

मुलांच्या बाबतींत पालकांचा व बहुजन समाजाचा असा अेक समज प्रचलित आहे कीं शाळांतून जे अेक प्रकारचे पुस्तकीज्ञान शिकविण्यांत येते, त्याचा व्यवहारांत फारसा उपयोग होत नाहीं; व त्यामुळे शाळांतून बाहेर पडणारीं बरीच मुलें " व्यवहारशून्य " ठरतात.

हा समज कांही नवा नाहीं. पण त्या बरोबरच पालक असें विधान करतांना आपणावरहि याबाबत कांहीं एक विशिष्ट जबाबदारी आहे हें ते विसरतात; किंवा त्यांचा प्रस्तुत विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा चुकीचा आहे हेच त्यांच्या ध्यानांत येत नाहीं.

मुलांना शालेय शिक्षण मिळत असतांना त्यांचा व्यावहारिक जगाशी या नाहींतर त्या कारणाने संबंध येतोच; पण तो संबंध योग्य रीतीने कुणी जुळवून द्यावयाचा याची नीटशी कल्पना नसल्याने पालक ती जबाबदारी शिक्षकांवर ढकलतात आणि शिक्षक, हें कर्तव्य पालकाचें आहे, आपलं काम फक्त शिकविण्याचं, म्हणून सोडून देतात. वास्तविक व्यवहारशास्त्राचें ज्ञान मुलांना देण्याचें कर्तव्य पालकांकडेच विशेषपणें येतें. शिक्षकांच्या शिकविण्याला

कांही अेक विशिष्ट बंधन असतें; आणि त्यांना त्या 'बंधनाच्या पलीकडे' मनांत इच्छा असूनहि जातां येत नाहीं.

मुलांचे पालक कधीं कधीं आपल्या मुलांना कांही वस्तू बाजारांतून आणावयास सांगतात; आणि त्या त्यांनी मनाजोग्या, योग्य किमतींत व योग्य वजनाच्या आणल्या नाहींत की अेखादी शेलकी शिवी हांसडून व त्यांच्या "व्यवहारशून्यते" वर कोरडे ओढून मोकळे होतात. पण त्यांचें हें वर्तन कितपत समर्पक ठरतें याचा कुणीच विचार करीत नाहीत. कधी कधी हें प्रकरण इतक्यावरच थांबत नाहीं तर "हेंच काय शाळेंत शिकवितात !" असें उद्‌गार काढून अप्रत्यक्षपणें हा दोष ते शिक्षकांच्या माथीं मारूं पाहतात; या पेक्षां पालकांनी आपल्या सवडीप्रमाणेच पण स्वतः लक्ष घालून थोडें थोडें व्यवहारविषयक ज्ञान दिल्यास मुलांच्या दृष्टीने ते फार हितावह ठरणारे आहे.

या बाबतींत कांही कांही पालक मोठे कडक व शिस्तीचे भोक्ते असतात. मुलांना व्यावहारिक ज्ञानाचे धडे कसे व कोणत्या पद्धतीने द्यावयाचे याचें कसब खरोखरीच वाखाणण्यासारखे आहे.

साधी भाजी आणावयाची झाली तरी ते आपल्या मुलांना उगीचच सोबत नेतील. रस्त्याने चालतांना ते विविध विषयांवर सारखी माहिती देतील.उदाहरणार्थ,रस्त्यावर एक पुतळा उभारलेला आहे,तो कोण्या व्यक्तीचा, तिचे कार्य काय होते, त्याचें थोडक्यांत जीवनचरित्र वगैरे सांगतील. रस्त्याच्या कडेला दुतर्फा जीं अनेक दुकानें असतात त्यांच्या पाट्यांवरून विविध प्रकारची माहिती द्यावयाची. "अनंत सॉ मिलची" एक पाटी आहे. तेथें लाकूड कापून विकण्यांत येते. चिरतांना जो भुसा तयार होतो तो स्वयंपाक, पाणी तापविणें, वगैरेच्या उपयोगांत आणला जातो. "बाटा शू" ची अेक पाटी आहे; त्यासंबंधीची माहिती अशाचप्रकारें ते मुलांना देतील. थेट भाजीआळींत आल्यावर अनेक भाज्यांच्या व फळफळावळीच्या उपयोगासंबंधीं सांगतील. मापांतले वजन उगीचच न्याहाळून ते त्यावरील आंकडे मुलांना समजाऊन देतील. भाजी घेतांना कोणकोणते अवधान राखायचे; किडलेली भाजी तेव्हांच कशी परत करावयाची; भाजीवालीच्या हातांतील

दांडीकडे व वजनांकडे कसें लक्ष द्यावयाचे वगैरे ते मोठ्या खुबीने समजावून सांगतील. नाहीतर कित्येक मुलांना अशी वाईट संवय असते की ते उभ्या उभ्या दुकानांत जातील व लागणाऱ्या वस्तूंची पटपट यादी वाचून व जे पदरांत पडेल ते न पाहतांच पिशवीत ओतून घेतील व नंतर घरीं आल्यावर त्याबाबत कुणीतरी बोलले म्हणजे कांही तरी सबबी सांगून स्वतःच्या व्यवहारशून्यतेवर पांघरूण घालतील.

आजच्या सुधारलेल्या जगांत मुलांना अनेक गोष्टींची माहिती असणें अत्यंत आवश्यक आहे. पोस्ट, दवाखाना, स्टेशन, बँक, लाईफ अॅशुरन्स कंपन्या, तसेंच सरकारी खजीना (Treasury) वगैरेची ओझरती माहिती त्यांना असणें फार चांगले; पालकांनी आपल्या छोट्या मुलांना (विशेषतः प्राथमिक शाळेंतील वरच्या वर्गांतील मुलांना) दवाखान्यांत नेऊन डॉक्टर, कंपौंडर, औषधें मिळण्याची जागा, नांव नोंदविण्याचें कार्यालय वगैरे दाखवून ठेवावें. त्यामुळे एखाद्यावेळी स्वतःच आजारी पडण्याची पाळी आली म्हणजे त्यांची फार मदत होते. तसेंच पोस्टाच्या कामासंबंधाने सांगता येईल. पोस्ट कार्ड, लिफाफे कुठे मिळतात, सेव्हिंग बँक म्हणजे काय ? पैसे जमा करणें अगर काढणें याची माहिती, तसेंच मनिऑर्डर, व्ही. पी. व तार कशी करावयाची वगैरे माहिती त्यांना सहजगत्या देतां येण्यासारखी आहे. प्रौढ मुलांना लाईफ अॅशुरन्स कंपन्यांचे प्रिमियम वगैरे पटविण्याची माहिती; ज्यांनी बँकांतून पैसे ठेवले आहेत अशांना बँकांची माहिती देऊन ठेवणें अवश्य आहे. अशामुळे मुलांना विविध माहिती तर होतेच पण त्यामुळे, कोठेहि जाण्याची हिंमत व कुणाशीहि निर्भीडपणे बोलण्याची संवय लागते. आजकाल कित्येक प्रौढ मुलें कुठे जावयास सांगतांच ते टाळण्याचे पाहतात. किंवा गेल्यावर तिथे बुजतात, रेंगाळतात व त्यामुळे त्यांच्यावर सोपविलेलीं कामें नीट होत नाहीत. शिक्षकांनासुद्धां शाळेंत वक्तृत्वोत्तेजक बालसभा नियमितपणे भरवून व सुटीच्या दिवशी जवळपासच्या प्रेक्षणीय स्थळांच्या सफरी काढून व कँप भरवून मुलांना मोकळ्या हवेची निसर्गसौन्दर्याची आणि जगाची विविध माहिती द्यावी.

समाजांत उत्तरोत्तर बेकारी फार वाढूं लागली आहे. शालेय परीक्षेंत उच्चांक व उच्चश्रेणी मिळवूनसुद्धां व्यवहार-व्यवसायाच्या

क्षेत्रांत जेव्हां हीं मुलें उतरूं लागतात, तेव्हां त्यांपैकी कित्येक अयशस्वी कां ठरतात याचें कारण हेंच आहे की, मुलांना लहानपणापासून उपरोक्तदिशेने व्यवहाराचे थोडेंफार ज्ञान, मग तें पालकांनी किंवा शिक्षकांनी किंवा दोघांच्या सहकार्याने देण्यांत आले, तर त्यांचे भावी आयुष्य पुष्कळच सुखी होईल.

प्रौढ मुलांनी सुद्धां वरील विवेचनावरून इष्ट तो बोध घ्यावा व आपल्या " धाकटचांना " मार्गदर्शन करावें.

• • •

# २ : मुलें आणि शिस्त

एकदां एक शालाधिकारी शाळा तपासण्यास दौऱ्यावर निघाले; त्यांचा मुक्काम त्या गांवच्या विश्रामगृहांत होता, अनायासे माझा आणि एका तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाचा कांही कार्यकारणपरत्त्वे मुक्काम पडला तो सुद्धां त्या विश्रामगृहांतच.

शाळा तपासणीला लागूनच त्या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन असल्यानें साहजिकच त्या शाळाधिकाऱ्याला अध्यक्ष बनविण्यांत आले आणि त्यामुळें त्याला मुलांच्या हितोपदेशपर चार शब्द बोलणें भाग पडले. त्या शालाधिकाऱ्याने "मुलें आणि शिस्त" या विषयावर तब्बल तासभर व्याख्यान दिलें. निमंत्रित पाहुणे म्हणून आम्ही सुद्धां त्या प्रसंगी हजर होतो.

शाळाधिकाऱ्याने आपल्या व्याख्यानांत 'आजकाल मुलें फार गैरशिस्त व बेजबाबदार बनत चालली आहेत. त्यांच्या सभोवतालचें वातावरण आणि सध्याचे प्रचलित वाङमय, चित्रपटादि संमोहक साधनें इत्यादि त्या गोष्टीला कारणीभूत आहेत. पालकांच्या कडक शब्दांना व शासनालाहि ते कित्येक प्रसंगी जुमानीत नाहींत. त्यांनी हा मार्ग सोडून द्यावयास हवा. उद्यांच्या आदर्श भारताचे ते एक घटक आहेत. त्यांचे जीवन शिस्तबद्ध, सेवाशील व

नम्र असावे;' वगैरे सांगून शिस्तीचे महत्त्व पटविलें आणि टाळ्यांच्या गजरांत त्यांनी आपले भाषण संपविलें.

आम्हीं नंतर सर्वजण परत विश्रामगृहांत आलो. भोजनोत्तर व्हरांड्यांत जेव्हां आम्ही तिघेजण सहज गप्पा करीत बसलो तेव्हां अनायासे शालाधिकाऱ्याच्या व्याख्यानाविषयी गोष्टी निघाल्या. मी वनविभागांत असल्यानें मला त्यांत अभिप्राय देण्याजोगें असें कांहींच नव्हतें. माझ्या मतें त्याला कांहीं किंमतहि नव्हती. पण त्या तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाचे मत मात्र खरोखरीच मोलाचें होतें; आणि तोहि तसा मोठा खेळकर व गंमती स्वभावाचा असल्यानें त्या गप्पांना विशेषच रंग चढला.

"मुलें आणि शिस्त" ह्या दोन वस्तूंचें छत्तीसच्या आंकड्यांइतकें सख्य असते व बालमानसशास्त्रष्टच्या मुलांना शिस्तीचें पाठ पचनी पडणें अवघड जात असते. असें तो प्रतिपादन करून पुढें म्हणाला, "प्रस्तुत विषयांत सर्व दोष मुलांवर ढकलण्यांत येतो पण त्यांचा संपर्क ज्या पालकांशी आणि गुरुजनांशी येतो त्याकडे कुणीच ढुंकून पहात नाही. शाळेंत मुलांनी शिस्त पाळायची याचे बंधन जसें शिक्षक त्या विद्यार्थ्यावर घालूं पहातात तसें ते स्वतःच्या आचरणांत आणीत असतात किंवा कसें हें सुद्धां पहावयास हवे. साधे उदाहरणः—मुलांनी धुम्रपान करूं नये. पण महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसमोर या विषयावर कंठशोष करून धूम्रपानाचा निषेध करणाराच जर स्वतः धूम्रपानी असला तर त्यांच्या उपदेशाचा काय व कितपत उपयोग होणार? तसेंच पालकांचे; मुलांस सकाळी उठावयास सांगणारा पालक स्वतःच जर चांगली उन्हें वर येईतोंवर अंथरुणांत लोळत राहणारा असला तर त्याच्या सांगण्याचा उपयोग काय? व्यवहारांत किंवा रोजच्या दैनंदिनीत ह्या आणि अशाच गोष्टी घडत असतात; आणि त्यामुळेंच त्या परिणामकारक ठरत नाहींत; मुलांची मनें वास्तविक मडक्यासारखीं असतात. जशी वांकवावीं तशी वांकतात. घडवावी तशी घडतात; त्यांच्याकडून आपण ज्या शिस्तीची अपेक्षा करीत असतो त्याचा आदर्श पालकांनी व शिक्षकांनी प्रथम आपल्या जीवनांत आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

व्यवहारांत आपण पहात असतो कीं घरी पालक मुलांना या ना त्या कारणांवरून थोड्याशाहि चुकांकरितां सारखे बोलत असतात. त्या बोलण्याचा

प्रथम प्रथम थोडासा परिणामहि होत असतो; नाहीं असें नाही; पण पुढें सारखें त्याच त्या बोलण्याने किंवा वोंचणीने त्यांची मनें अेकतर निगरगट्ट किंवा बोथट बनतात; आणि इथेंच शिस्तीला पूर्ण समाधि मिळत असतें. वडीलजनांविषयीच्या एक प्रकारच्या आदराविषयीची कल्पना उत्तरोत्तर त्यांच्या मनांतून नाहिशी होऊन तेथें एक निराळाच भाव प्रतीत होत असतो. तीं नंतर तुच्छतेने किंवा भावनारहित दृष्टीनें तिकडे पहात असतात.

आपल्या मुलांना शिस्तीचे शिक्षण द्यावयाचे झाल्यास पालकांना किंवा त्यांच्या शिक्षकांना स्वतःला कांहीं शिस्तबद्धतेचे नियम प्रथम लावून घेणे इष्ट ठरतें. त्या शिवाय ते मुलांवर आपला प्रभाव पाडूं शकणार नाहींत. मुलांच्या कोमल मनावर जबरदस्तीचे व प्रसंगी दंडुक्याचे दडपण नेहमीच यशस्वी होत असते असें नाहीं; उलट याच कारणास्तव पालकांना किंवा शिक्षकांना अवमान सोसून घ्यावा लागतो. दुसरें असें कीं मुलांना त्यांच्या दैनंदिनीत शिस्तीचे वळण लावावयाचे झाल्यास त्यांच्या एकंदर दिनक्रमाच्या वेळेची योग्य तऱ्हेने वाटणी करून द्यावयास हवी.

शिक्षकांनी ह्या बाबतींत मुलांवर नीट निगा राखून शिस्त पालन करविणें सहज शक्य आहे. पण वडीलधाऱ्या पालक मंडळींना स्वतःच्या उदर-निर्वाहाचा प्रश्न सोडवून प्रस्तुत बाबींकडे लक्ष द्यावयास कित्येकदां जमत नाहीं, तरी शक्यतोंवर ह्या बाबींकडे लक्ष देण्याची व त्याप्रमाणें शक्य तेवढें पालन करण्याची जबाबदारी ते टाळूं शकत नाहींत.

मुलांना वेळेची वांटणी करून देणें बऱ्याच पालकांना शक्य आहे. शाळेंतील अभ्यासक्रम व खेळाप्रमाणेंच त्यांना मुलांच्या घरीं असणाऱ्या वेळेचा सदुपयोग कसा व कशा रीतीने करावा या संबंधी थोडें फार शिक्षण देणें अगत्याचे ठरते. पालकांना मुलांचे प्रातर्विधि, स्नान, अभ्यास व खेळ आणि सहजगत्या मिळूं शकणारें व्यावहारिक ज्ञान यांची त्यांच्या दैनंदिनींत कशी सांगड घालून द्यावयाची अेवढें जरी समजलें तरी मुलांना मग कसल्याहि शिस्तीची आवश्यकता नाहीं. ठरलेल्या व नेमक्यावेळीं ठरलेली व नेमकी कामें करण्याची संवय एकदा अंगवळणी पडली कीं हें काम फत्ते झालेच म्हणून समजा. विविधता हा विद्यार्थ्यांना नेहमी हवा असणारा एक गुण आहे. त्या

दृष्टीने शनिवार–रविवारच्या ठरीव चाकोरीच्या बाहेर पडून निरनिराळ्या वस्तु, विषयांत विद्यार्थ्यांचे लक्ष घालणें हें शिक्षकांचे कर्तव्य ठरतें. सहली, वनभोजन, वक्तृत्व, सभा, स्पर्धा, चढाओढ हीं साधने म्हणजे मुलांना शिस्तीचे शिक्षण देणें नव्हे तर दुसरें काय ?

छोट्या मुलांना बालकमंदिरांत पाठविणें, माँटेसरी पद्धतीनें शिक्षण देणें व कांहींकाल त्यांच्या पालकांपासून (विशेषतः मातांपासून) दूर ठेवणें यांतील अर्थ हाच कीं घरीं नुसता गोंधळ घालून किंवा हट्ट धरून रडारड करण्यापेक्षां व मातापित्यांना उगीच त्रास देण्यापेक्षां मुलांना असें शिस्तीचें शिक्षण मिळेल. त्यांचीं मनें निरनिराळ्या वस्तु-विषयांत रमतील. विकसित प्रौढ मुलांना मोकळ्या हवेंतील शारीरिक खेळांत सामील करणें ह्या पोटीसुद्धां हाच अर्थ आहे.

अभ्यासक्रमासंबंधीहि याच रीतीनें विचार करतां येण्यासारखा आहे. कित्येक पालक मुलांना अभ्यास करीत नाहींत म्हणून सारखे रागावतात, आणि शिक्षक शाळेंत शिक्षा करीत असतात. पण त्या मुलांचा किंवा विद्यार्थ्यांचा अभ्यास कां होत नाहीं किंवा तो कसा आहे व तो नीट व्हायला काय करायला हवें, इकडे पालक आणि शिक्षक मुळीच लक्ष देत नाहींत. चार शेलक्या शिव्या किंवा प्रसंगविशेषीं जुजबी शिक्षा देण्याने हा प्रश्न निपटणारा नसतो व अगदीं सुरवातीपासून आठवडी किंवा मासिक तपासणीचे सूत्र पालकांनी व शिक्षकांनी पाळले तर मुलांच्या अभ्यासक्रमाचे बाबतींत त्यांना बरेंच निश्चित राहतां येण्यासारखे आहे.

तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक नंतर म्हणाले कीं आतांपर्यंतच्या विवेचनावरून कुणाला असेंच वाटण्याचा संभव आहे कीं मुलांच्या शिस्तीबद्दल शंभर टक्के पालक व शिक्षकच जबाबदार आहेत. मुलांचा त्यांत वास्तविक कांहींच दोष नसतो. पण तसें कांहीं नाहीं. मुलांनी अगदीं शिस्तीत वागावयास हवें आणि त्याकरितां त्यांना एकंदर अवलोकनाची व मार्गदर्शनाची अत्यंत आवश्यकता आहे. वाईट व व्यसनी मुलांच्या संगतीपासून दूर राहण्याचा त्यांना जो उपदेश मिळत असतो तो ह्याचकरितां. मुलामुलांत सहकार्य व मित्रभाव उत्पन्न होणें हें शिस्तीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याच

प्रमाणें चांगल्या पुस्तकांचे वाचन, दैनंदिनी ठेवण्याची पद्धत व अभ्यासक्रमा व्यतिरिक्त दुसऱ्या वेळेचा योग्य तऱ्हेने उपयोग करून घेण्याकरितां स्वयं-स्फूर्तीने तयार केलेली वेळापत्रके विद्यार्थी जीवनांतील अत्यंत महत्त्वाचे कार्य होय व याचे काळजीपूर्वक परिपालन करणें म्हणजेच शिस्त राखणें होय. प्रौढ विद्यार्थ्यांनीं ह्या बाबतींत अत्यंत निकडीने लक्ष घालावयास हवें. आणि आपल्या धाकट्यांना तदनुसार मार्गदर्शन करावयास हवे.

बोलण्याच्या वेगांत किती वेळ निघून गेला हें कुणालाच कळलें नाहीं पण सभोवतालच्या गंभीर वातावरणांत जवळच असलेल्या पोलिस चौकी-वरून बाराच्या ठोक्यांचा नाद कानी पडला तेव्हां सर्वांच्याच ध्यानीं आले आणि नंतर आम्हीं तिघेहि झोपण्यास उठलो. रात्रीं त्या प्राध्यापकाने निवे-दल्याप्रमाणें मला झोपेंतच "मुलें आणि शिस्त" या विषयीची विविध दर्शनें घडली; आणि एक प्रकारचा अपूर्व आनंद वाटला.

• • •

# ३ : मुलांचें गृहराज्य (Boys Home Govt)

बदलत्या कालक्रमानुसार मध्यमवर्गीय जीवन समस्या बदलत चाललेल्या आहेत. मध्यमवर्गीयांची आर्थिक परिस्थिति मुलांचें शिक्षण, कार्यकारणपरत्वें त्यांचे शिक्षकांशीं येणारे संबंध व त्यांतून दिवसेंदिवस होणाऱ्या सहकार्याच्या भावना याचा बाल व प्रौढ विद्यार्थ्यांच्या मनावर दिवसेंदिवस सुयोग्य परिणाम होत असल्याचे दिसून येईल. श्रमदान-पद्धतीचीहि अभिनव कल्पना विद्यार्थी वर्गात मोठ्या प्रमाणांत व अहमहमिकेनें स्वीकृत होत असल्याचें आपण प्रत्यही पाहात आहोंत. अशा परिस्थितींत गृहराज्य (Home Govt.) सारख्या कल्पना अस्तित्वांत आल्यास त्याचे इष्ट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहींत.

परवां जेव्हां मी ऑफिसांतून घरीं आलों तेव्हां माझ्या मुलानें एक निमंत्रण पत्रिका हातीं ठेवली. मार्गशीर्षाचे दिवस जवळ आलेले; तेव्हां मला साहजिकच वाटलें की, कुणातरी आप्ताकडील ही लग्नपत्रिका असावी. पण ती वाचून पाहतांच मला आश्चर्याचा धक्का बसला.

माझा मुलगा ज्या हायस्कूलांत शिकत होता त्या शाळेच्या मुख्या-ध्यापकानें यंदा शाळेतर्फे "पालकदिन" पाळण्याचें ठरविलें होतें. आणि त्या निमित्तानें कांही सांघिक मैदानी खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम ठेवून

अनुक्रम 32293
क्रमांक 9329
दि: 15/7/58
नों दि: 7/7/58



पालकांतूनच कांही मंडळींची व्याख्याने ठेवली होती. एकदर कार्यक्रम चांगलाच भरभक्कम स्वरूपाचा असून समारोपाचें भाषण व बक्षिस समारंभ जिल्हाध्यक्ष करणार होते. त्यामुळें एकंदर कार्यक्रमाचा भारदस्तपणा दिसून येणार होता.

आमच्या लहानपणीं हे असले कांहीं कार्यक्रम होत नव्हते; आणि पालक–शिक्षकांचें घनिष्ठ संबंध तर दूरच राहोत पण कित्येकांस तोंड-ओळखसुद्धां नसे व त्याविना कांहीं अडतहि नव्हतें.

त्याच हायस्कुलांत माझा वडील मुलगा सुधाकर हा यंदा मॅट्रिकला होता; आणि त्याची धाकटी बहीण सुधा दहावीत होती.

शाळेंतील त्या कार्यक्रमासंबंधाने सविस्तर सांगण्याची कांहीं गरज नाहीं; सांस्कृतिक कार्यक्रमांत ठळकपणें नजरेंत भरणारा एक ‘ सेल्फ गव्हर्नमेंट ’ हा प्रयोग झाला व तो अभिनव वठला. मुलांनी शिक्षकांच्या भूमिका सांभाळून त्या यशस्वी रीतीने पार पाडून दाखवावयाच्या, निवडणुकी लढवून नियुक्त सभासदांतून पक्षोपपक्षांच्या विचारांची एकसूत्रीपणानें मांडणी करून त्यावर चर्चा करावयाची; त्यावर नर्म–गर्भ विनोद व खडाजंगी उडून शेवटीं निश्चित मत–निष्कर्ष काढायचा. तो एकंदर कार्यक्रम पाहून मला मोठे प्रसन्न आणि आशाजनक वाटलें. “ आजची पिढी–मुलं-मुली उद्यांचा आधारस्तंभ होता. त्यांच्यावर देशाची मोठीच जबाबदारी आहे. ” ह्या आणि असल्याच अनेक व्याख्या त्यांच्या तोंडून ऐकल्या. वाक्यांचा अर्थ हा प्रसंग पाहिल्यानंतर यथार्थ वाटूं लागला आणि त्यांत आनंदाची व अभिमानाची गोष्ट म्हणजे त्या नियुक्तसभेच्या अध्यक्षाचे काम मोठ्या मुलाच्या–सुधाकराच्या वाट्याला आले होते आणि स्त्रीसभासदांत सुधी प्रामुख्यानें होती. दोघांनाहि त्यांच्या उत्कृष्ट कामाबद्दल जिल्हाध्यक्षांच्या हस्तें पारितोषिकं मिळाली होती.

त्यानंतर आणखी कांहीं दिवस लोटले. एके दिवशी सकाळची न्याहारी व चहा चालू होता. मध्यमवर्गातील कुटुंबांतील स्त्रियांवर पडणारी जबाबदारी, एकट्या माणसाची मिळकत आणि त्यावर अवलंबून असणारे चार जीव; त्यांचें सर्व कांहीं सांभाळण्याचें काम घरांतील गृहिणीकडे असा-

वयाचे. यामुळें ती सदाचीच जिकिरीला आलेली असते व वेळप्रसंगी ती त्यामुळें चिडखोर वृत्तीची बनते. कधीं मुलांवर तर कधीं अप्रत्यक्षरीत्या 'तिकडच्या'वर रागावते असें कांहीं चालू असतें. तिला तिच्या दैनंदिन कार्यक्रमांत थोडाफार बदल हवा असतो. विश्रांतीचीहि अधूनमधून आवश्यकता असते. पण हें सर्व पतीच्या एकटया व तोकडया मिळकतीमुळें अशक्य असतें. उलट घरांतील अशा एकंदर वातावरणामुळें क्वचित् प्रसंगी त्याचेवर "शेषं कोपेन पूरयेत" अशी पाळी येते. खरें सांगायचें म्हणजे माझी स्थितीसुद्धां अगदीं वर वर्णन केल्याप्रमाणें होती आणि मनाला थोडा विरंगुळा नि विश्रान्ति मिळावी म्हणून आम्ही दोघें त्यासंबंधीं बोलत होतो. मुलांनी– सुधाकरने आणि सुशीने तें ऐकलें असावें. कारण त्या दिवशीं रात्री जेवतांना आम्हांला तीं दोघेंहि मुलांच्या गृहराज्याची (Boys Home Govt.) विशद करून सांगू लागले. त्या दिवशी मला वाटतें शनिवार असावा; दुसरें दिवशीं रविवार असल्यानें अर्थात् कचेरीला व शाळांनासुद्धां सुटी होती. सुधाकर सांगू लागला, " बाबा, आणि आई तूं सुद्धा बरं–उद्यां संपूर्ण सुट्टी घ्यावयाची; आणि मजेंत वेळ घालवायचा. मी आणि सुशी दोघांनी सगळं सगळं कांहीं पाहून घ्यायचं ठरवलं आहे."

...आणि खरंच रविवारी सुधा–सुशी अगदी भल्या पहांटे उठलीं.त्यांनीं विहिरीवर जाऊन उजाडण्यापूर्वींच पाणी भरून टाकलं. सुधानं सारं घर कसं स्वच्छ झाडून टाकलं. सुशीनं अंगणांत सडा घातला. रांगोळचा घातल्या. घरांतील फरशा स्वच्छ धुवून काढल्या व आंघोळ करून चहाचं आधण ठेवलें. आई-वडिलांना तोंड धुण्याकरितां गरम पाणी वगैरे दिलं; तोवर सुधानं आपली आंघोळ उरकून चहाची व्यवस्था केली. सर्वांनी मिळून हंसत खेळत चहा घेतला. तदनंतर आईने वेणीफणी केली व सुधाचे वडील नुकतीच आलेली वर्तमानपत्रें चाळीत बसले. सुशी स्वयंपाकाला बसली व सुधाकर तिला मदत करूं लागला. ठीक दहा वाजतां त्यांनी सर्वांची पानें मांडली, व सर्व कांहीं बारा वाजेपर्यंत नीटपणें निस्तरले. त्या दिवशीच्या मुलांच्या हातचा साधासाच स्वयंपाक गोड लागला. दुपारचे ते अंमळ विश्रांती घ्यावयास

लागले. सुधा–सुशी पण दोघेहि थोडा वेळ लवंडले. ठीक चार वाजतां सर्वांचा दुपारचा चहा झाला. आज सुधाच्या वडिलांचा आईबरोबर गांवाबाहेरच्या टेकडीवरील देवीचे देवळांत जाण्याचा बेत ठरला होता. त्याप्रमाणें ते दोघे तिकडे निघाले. त्यांना आजच्या सहलींत विशेष आनंद वाटत होता. अंगांत उत्साह संचरला. व दोघंहि मोठ्या हुरुपानें बाहेर पडलीं. हंसत खिदळत व सभोंवतील स्निग्ध व शांत वातावरणाचा व मोकळ्या हवेचा आस्वाद लुटीत मंदिराकडे चालले होते. टेकडीवर चढल्यानंतर ती अवर्णनीय निसर्ग शोभा पाहण्यांत त्यांना अमूप आनंद वाटत होता. क्षणभर तीं दोघेहि भान हरून गेली आणि ज्यावेळीं तीं घरीं परतलीं तेव्हां सायंकाळचा साडेसातचा सुमार असेल. सुधा–सुशीनीं सर्व घर कसें स्वच्छ ठेवलें होतें आणि स्वयंपाक पण तयार झालेला होता. प्रथम आईवडिलांनी हातपाय धुवून स्वच्छ केले. सर्वांनीं देवघरांत जाऊन व हात जोडून सामुदायिक प्रार्थना म्हटली. आणि देवाला प्रणिपात करून भोजनास आरंभ केला. सुशीच्या स्वयंपाककौशल्याची व सुधाच्या एकंदर सुव्यवस्थेची अगदीं वाखाणण्यासारखी ठेवण होती. रोजच्यापेक्षां कांही निराळे जीवन जगल्याचें भासत होते. व काव्य-शास्त्र विनोदानं भोजन संपलें.

आज मुंबईहून कांहीं खास खेळ करण्याकरितां शांता आपटे आपली नाटयकला मंडळी घेऊन आली असून त्या कंपनीचा पेटंट खेळ 'विद्याहरण' लागला होता. सुधानें आगाऊच जागा रिझर्व्ह करून ठेवल्या असल्यानें नाट-काला अगोदर जाऊन बसण्याची घाई नव्हती. सुशीनें घरांतलें सारें कांहीं आटोपतें घेतले व कपडे बदलून तीपण नाटकाला यायला तयार झाली. त्या दिवशीं नाटकाला खूपच रंगत चढली. नाटयरत्न नेवरेकर (कच) आणि शांता आपटे (देवयानी) यांनीं गाणीं गाण्यांत नुसती (Competition) स्पर्धा गाजविली व अक्षरशः 'वन्समोअर'चा पाऊस पाडला.

सर्वांचें मत आज एका नव्या वातावरणामुळे आनंदी होतें. सुधा-सुशीला एरवीं घरांतलें इकडले तिकडे करावयास केवढा कंटाळा ! चिडल्या-शिवाय किंवा रागावल्याशिवाय ती क्वचितच कामाला हात लावायची; पण आज सर्वस्वीं गृहसत्ता त्यांच्या हातांत होती व नव्या श्रमदानपद्धतीनुसार

त्यांनीं आपापल्या कामाचा वांटा उचलून आजच्या दिवसापुरतें आईवडिलांना विन्मुक्त (Relieve) केलें होतें.

ठीक दीडला नाटक संपलें आणि सर्व मंडळी घरीं आली. सुधाकरचे आईनें सुधाला व सुशीला जवळ बोलावून पोटाशीं धरलें आणि आनंदाश्रु गाळून त्यांना शुभाशीर्वाद दिला. सुधा–सुशीनें यापुढें असेंच सहकार्य देण्याचे जाहीर केलें आणि वडिलांकडून शाबासकी पटकाविली.

" शाबास सुधाकर; शाबास सुशी " माझ्या तोंडून अभावितपणें शब्द बाहेर पडले. आणि तितक्यांत टाळ्यांचा कडकडाट झाला.

...मी भानावर येऊन डोळे उघडून पाहतों तो पालक दिना–संबंधानें चालू असलेलें अध्यक्षीय भाषण संपलेलें होते व आतांपर्यंत घडलेलें सारे भांगेच्या तारेंतील स्वप्नच ठरले.

मात्र या प्रसंगानें मला ही गोष्ट माझ्या मुलांपुढें व पर्यायानें आजच्या प्रौढ युवक-युवतींपुढें विचारासाठीं मांडण्याची संधि मिळाली. माझ्यासारख्यां अनेक मध्यमवर्गीय पालकांच्याहि विचारांना चालना देणारा हा प्रश्न ठरेल.

आजकाल विद्यार्थीवर्गाला बरेचदां बेजबाबदार म्हणून ठरविण्यांत येत असतें. पण त्यांच्या सेवेला असलेल्या अमूल्य व भरपूर वेळेचा विनियोग कसा करावा याचीं कित्येक पालकांना कल्पना नसते. मुलांच्या मनावर अशा प्रकारें कांहीं ठसविल्यास व त्याला समंजस वृत्तीने योग्य स्वरूप दिल्यास प्रस्तुत लेखाच्या शीर्षकासारख्या कल्पना आजचीं मुलें पटकन् उचलतील व त्यापासून अनेक पालकांचा फायदा होईल.

प्रौढ मुलामुलींनीं तर ह्याविषयीं अवश्य विचार करावयास हवा. मोठमोठ्या उदात्त कल्पनांचे शेंकडों सांस्कृतिक कार्यक्रम रंगभूमीवर वठविण्यांत व वाहवा मिळविण्यांत भूषण नाहीं; पण त्यांतील तत्त्वांचे अनुकरण व परिपालन करून अंगीं बाळगण्यांत खरें श्रेय आहे; आणि त्यादृष्टीनें विचार करावयास हवा. ह्या कामीं शिक्षक व पालक वर्गाचें सहकार्य लाभल्यास विद्यार्थ्यांच्या अंगीं समंजसपणा येण्यास अवसर लागणार नाहीं.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों दि: ....................

# ४ : मुलें आणि वाचनालयें

आज आमच्या चाळींत पेढे–प्रदानसमारंभ झाला; कां तर चाळीतील मुलं परीक्षा पास झालीं होतीं. आमच्या चाळीचा 'अभिनवता'' हा एक विशेष आहे. मुलांच्या गृहराज्याची कल्पना ह्या 'चाळींत इतकी कांहीं रुजली कीं, आतांशा रविवार म्हणजे पालकांना आणि मातांना तो एक सुट्टीचा नी मजेचा दिवस वाटतो.

परिक्षा पास झाली कीं पेढे वाटायची पद्धति कांही नवीन नाही; पण त्यांत अभिनवता नाही. सुखटणकरांच्या चंद्रशेखरनं मात्र जो ''युवक संघ'' स्थापन केला होता त्यामुळं या पेढे वाटण्याच्या साध्या प्रसंगाला असं कांही सुंदर नी झकास पार्टीचं स्वरुप आलं कीं जो तो चंद्रशेखरच्या कल्पनेचं कौतुकच करूं लागला. साऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांकडून त्यानं पेढ्याचे पैसे वसूल केले आणि चाळीतील आजीबाई, आक्का–मावशी–काकू–ताई या सर्वांचे गोडीगुलाबीने साहाय्य मिळवून खाऱ्या मालाचा खमंग पुरवठा हस्तगत केला. दामुअण्णांच्या प्रशस्त हॉलमध्यें रविवारची सायंकाळी पांचची वेळ ठरली; आणि थोड्याच वेळांत त्या जागेला एखाद्या संमेलनाचे (लाऊड, स्पीकर; वाद्य वगैरेसह ) स्वरुप प्राप्त झालें.

सुरवातीला यशस्वी विद्यार्थिनींचे स्वागत–गीत होऊन चंद्रशेखरचे प्रास्ताविक, दामुअण्णांचे हितोपदेशपर आणि यशस्वी विद्यार्थ्यांच्या अभिनंदनपर भाषण होऊन हा संगीत "खारा–मिठा पेढेप्रदान समारंभ" पार पाडला. कांहीं वडीलधाऱ्या मंडळींनी स्वयंस्फूर्तीने छोट्यांना बक्षिसेंपण वाटली. शेवटी चहा, पानसुपारी व "वंदेमातरम्" होऊन सर्वांनीं मोठ्या आनंदाने निरोप घेतला.

थोड्या वेळानें जेव्हां मी घरीं येऊन पोहोंचलों तेव्हां सुशी व सुधाकर यांच्यामध्यें कसला तरी वाद चालूं होता. मी आपल्या खोलींत जरा बाजूला बसून तो ऐकूं लागलों. मोठ्या मजेचा वाटला तो; आणि त्यानें मला विचारप्रवणहि केलें. त्यांचा सर्व रोख वाचनालयांवर होता. शाळांना आतां सुट्या लागलेल्या. तेव्हां विद्यार्थ्यांचा फुरसतीचा वेळ खेळ व वाचन यांत जाणार. शाळांतील वाचनालयांतून मुलांना केव्हांच नीटशी व मनाजोगी पुस्तकें मिळत नाहींत. शाळा चालूं असतांना शिक्षकांची नेहमीची कुरकूर. "अभ्यासाची पुस्तके वाचायला नकोत. चटोर वाङ्मय हवं. कशाला हवीत तुम्हांला ही पुस्तकं." आणि आतां शाळा बंद झाल्या तेव्हां मागायला गेलांत तर "सुट्यात कसलं आलं आहे वाचन; कुठं तरी पुस्तकं धूळ खात पडायची, नाहीं तर हरवायची." म्हणून ती देण्यांत येत नाहींत. एकूण दोन्ही वेळा विद्यार्थी–वाचकांची कुचंबणाच होते. हे अनुभव प्रत्येक शाळां तून थोडाफार आहेत. शाळांतील वाचनालयाचे काम पाहणारा शिक्षकां पैकींच कुणी तरी ऐखादा असतो. त्याचेवर त्याच्या कामाव्यतिरिक्त हें काम लादण्यांत येते. तो खरोखरीच साहित्त्य प्रवृत्तीचा आहे किंवा कसें हे कुणीच पहात नाहीं. अशा स्थितीत त्याचेकडून मुलांना पुस्तक वांटणाचे काम कसें नीट होणार. कांहीं तरी करावयाचे म्हणून तो कंटाळा करीतच दहापांच विद्यार्थ्यांची आवक जावक नोंद करून पुस्तके देतो व बाकीच्यांना तो कसल्याना कसल्या सबबीवर टाळीत असतो. शिवाय पुस्तकाची निवड विद्यार्थ्यांच्या अभिरुचीच असते असे नाहीं. कित्येकदां बोजड व विद्यार्थ्यांना न पेलणारे, व न रुचणारे ग्रंथ बोलावण्यांत येतात व त्यामुळें त्यांची जिज्ञासा व वाचनाची आवड कमी कमी होत जाते. नव्या व ताज्या पुस्तकांचा सांठा वेळों-

वेळीं न केल्यामुळें विद्यार्थ्यांना प्रचलित वाङमयनिर्मितीची तोंड ओळखहि नसते.

सुधाकर-सुशीची ही चर्चा ऐकून माझे मन सार्वजनिक वाचनालयाकडें वळले. कारण अेक तर कचेरींतून आल्यानंतर दररोजच्या ताज्या वृत्तपत्रांतील मजकूर वाचण्याकरितां तेथें जावयाचा क्रम आहे. आणि मासिक वर्गणी आणि कांहीं डिपॉझिट ठेवलें म्हणजे कांहीं पुस्तकें वाचावयास मिळतात. मात्र तिथली स्थिति तर वाखाणण्यासारखीच असते. एका एका वृत्तपत्रांत चार चार डोकीं वाचनांत गर्क असल्याचें दृश्य कुणालाहि अपरिचित नाहीं. आणि इतक्यांचे वाचून तीं वृत्तपत्रें आपल्या हाती कशीं लागतील यासाठी टपून बसलेल्या वाचकांची अस्वस्थता पहावी. दैनिक, साप्ताहिकांची ही गोष्ट तर मासिकाच्या कथा वाचतांना वाचकांची कांही निराळीच तऱ्हा. त्यामुळे एखादे मासिक दुसरे नवें येईपावतों कित्येक वाचकांना आंत नुसते डोकावून पाहूं म्हटल्यास मिळत नाही. आणि नवें आलें कीं जुने गडप. मला माहीत आहे आमच्या बंडूनानांचा एक लेख छापून आला पण त्यांना रीतसर संपादकाकडून येणारा अंक कांही आला नाही. लेख छापून आल्याचेच मुळी पंधरा दिवस बंडू नानांना कळलें नाही आणि कळल्यानंतर तो त्यांच्या दृष्टीस पडण्यास आणखी पंधरा दिवस लागले.

अलीकडे कोडयांच्या प्रसारामुळें, वाढत्या बेकारीस्तव, wanted च्या जागेमुळें, आणि लगीन सराई मोसमांत " वर पाहिजे " वधू पाहिजे" ह्या वृत्तपत्रांतील स्थळांना केव्हा कात्री लागेल व त्यामुळें वृत्तपत्रांना कसें स्वरूप प्राप्त होईल, हे सांगता येत नाही. ही झाली टेबलावरील उघडया साहित्याची स्थिति. आतां कपाटांतील बंद पुस्तकांकडे वळूं.

पुस्तकांचा संग्रह दरवर्षी हाती असलेल्या फंडातून केला जातो. तो प्रकाशकांच्या पुस्तक सूचीवरून बहुधा क्रमशः घेतला जाणें ही स्थानिक वाचकांची प्रवृत्ती; एकंदर मागील अनुभवाचा फारसा विचार होत नाही. एकदां तर एका नगरपालिकेच्या वाचनालयांत ३१ मार्चपर्यंत पुस्तकें मागविण्यांत आली नाहीत आणि तो सगळा फंड (allotment) हातचा जाणार (lapse) म्हणून स्थानिक पुस्तक विक्रेत्यांकडे शिल्लक असलेली ज्योतिष्याची, धार्मिक पुस्तकेच त्यावर्षी खरीदण्यांत आली !

वाचकांना हव्या असलेल्या पुस्तकांची ग्रंथपालाकडे मागणी केली तर तीं बहुधा कपाटांत नसावयाचीच, किंवा (तीं कपाटांत असूनहि निव्वळ उठून व पाहून द्यावयाची कोणी म्हणून) ती बाहेर गेल्याचे बहुधा सांगण्यांत येते. कांही पुस्तकांच्या सतत वापरामुळें त्यांना बहुधा आदि–अंत राहात नाही. तर कित्येकदां पुस्तक पूर्ण असो किंवा नसो सुंदर बाइंडिंग करून जी वाचावयास मिळतात त्यांतील कित्येक पुस्तकांची आंतील पृष्ठे पहावीत तर ती अनुक्रमवार असतीलच असे सांगता येत नाही अशावेळीं–

सीतेनें वरिलें कृष्णास
जनकें आलिंगिलें कंसासी
राम गेले कुंडिनपुरासी
रुक्मिणी तें वराया–

असा कांही घोटाळा झाला तर नवल नाही.

अेकंदरीत आपणांकडील शाळांतील आणि स्थानिक संस्थांच्या देख-रेखीखाली चालणाऱ्या वाचनालयांतील परिस्थिती थोड्या फार फरकानें अशी आहे हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. मुलांना वाचनापासून किती तरी फायदा होतो व त्यांना न कळत बरेंच ज्ञान अवगत होत असते. आणि त्यांच्या वयोमानानुसार जर त्यांच्या हातीं योग्य अशी पुस्तकें पडत गेली तर त्यांच्या बुद्धीचा सुंदर विकास होत जातो व त्यांच्या भावी आयुष्यांत त्यांना त्या वाचनाचा व अनुभवाचा हरघडी उपयोग होत असतो.

प्रस्तुत लेखाचे क्षेत्र " मुले आणि वाचनालयें " असल्यामुळे विशेषत: शाळांतील वाचनालयाच्या दृष्टीनेंच विचार करणें अवश्य आहे. शाळांतील वाचनालयें चालविणाऱ्यांवर खरोखरीच त्यामुळें गोठी जबाबदारी येऊन पडते. तेव्हां तेथील ग्रंथपालाची निवड योग्य रीतीने होणें हें सर्वांत प्रमुख कार्य होय. आणि तें झालें म्हणजे ग्रंथाच्या निवडीचे काम अर्धें अधिक संपते. ह्या कामी ग्रंथपालाला वरच्या वर्गांतील प्रौढ विद्यार्थ्यांचे आळीपाळीनें साहाय्य पण देण्यांत यावे.

दररोजच्या बालवाचक वर्गांची उपस्थिती (attendance) घेण्यांत येऊन वाचावयास दिल्या जाणा-या ग्रंथावरून एक वार्षिक आढावा काढणें सहज शक्यआहे. त्यावरून मुलांच्या अेकंदर वाचनाचा दृष्टिकोण व आवड

नीटपणें लक्षांत घेता येईल. आणि त्यावरून पुढील संग्रहाकरितां कोणकोणती पुस्तकें बोलवावयाची याचें अनुमान काढतां येईल.

अलीकडे वाढत्या शिक्षणप्रसारांमुळें शहरांत अनेक शाळा स्थापन होतात. त्यांनी परस्परांशी सहकार्य ठेऊन एका विशिष्ट पद्धतीनें शाळांतून पुस्तकांची अदलाबदल( Periodical transfer) केली तर अनायासे थोड्या पैशांत मुलांना विविध वाचनाचा लाभ होऊं शकेल.

स्थानिक संस्थांच्या नियंत्रणाखाली चालणाऱ्या वाचनालयांतील सध्यांची पद्धति अत्यंत सदोष आहे. एका ठिकाणी तसे करतात म्हणून आपणहि त्याच धर्तीवर मांडणी करावी असा कांहींसा प्रकार दिसून येतो. " वाचनालयें कशी चालवावीत याचे योग्य शिक्षण अलीकडे बरेच सुलभ झालेले आहे व त्याकामीं ग्रंथपालाची निवड करतांना प्रथम योग्य ते शिक्षण देण्याची त्या त्या संस्थांनी व्यवस्था केल्यास ती (वाचनालयें) बऱ्याच अंशी सुधारण्यास वाव मिळेल.

खेडें आणि खेडेंवजा शहरांतील शाळा आहेत तेथे एक अभिनव पद्धति रूढ होत आहे त्यापासून पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. साधारणपणें एका परिघात( circle ) येणाऱ्या चार प्रमुख खेड्यांतील वाचनालयांना फिरते स्वरूप देऊन थोड्या पैशांत पुष्कळ ग्रंथांचें वाचन मुलांना घडूं शकतें. या आणि अशा फिरत्या वाचनालयाचा उपक्रम सध्या शिक्षण खात्यानें अनेक खेड्यांतील शाळांतून केलेला आहे. तीच पद्धत शहरांतील शाळा-शाळांतून सहकार्य भावानें अंगिकारल्यास फार चांगले. मी आपल्याच तंद्रींत निमग्न होतो. इतक्यांत जेवण तयार असल्याची सुशीनें वर्दी दिली आणि वाढायला घेतलें. आम्ही एकत्रच जेवायला बसलो आणि सुधाकरने लवकरच आपल्या चाळींत सुरू होणाऱ्या वाचनालयाची कल्पना दिली ती ऐकून तर मला आनंद झाला. सगळ्यांकडून एकेक वृत्तपत्राची वर्गणी वसूल करून युवक मंडळात दर्ज करावयाची आणि त्यांतून कांही दैनिकें, साप्ताहिकें व मासिकें बोलवावयाची व सगळ्या आबाल-वृद्धांनी त्याचा फायदा घ्यावयाचा.

सारी रात्र माझ्या नजरेसमोर सुधाकराच्या उद्याच्या " युवक " वाचनालयाचे विविध व मनोरम दृश्य आलटून पालटून दिसत होते आणि मनाला अत्यंत आनंद वाटत होता.

● ● ●

# ५ : शालेय स्नेहसंमेलनासंबंधीं

आज मी शाळांमधून भरणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनासंबंधानें चार शब्द सांगणार आहे. पूर्वी असें समारंभ फारच क्वचित व विशेषत: हायस्कुलांतून होत असत, आणि तेव्हां शिक्षणाचा तेवढा प्रसार न झाल्यानें त्याचें स्वरुपहि अत्यंत मर्यादित असे. पण उत्तरोत्तर शिक्षणाचा प्रसार होत गेला.एकाच शहरांत एका सरकारी हायस्कूल-मिडलस्कूल बरोबर अनेक खाजगी शिक्षणसंस्था निर्माण होऊं लागल्या आणि तदनुसार शालांतर्गत होणारे स्नेहसंमेलनाचे समारंभ दरेक शाळांतून होत गेल्याने तिकडे सहजच नागरिकांचेहि लक्ष वेधूं लागले. बदलत्या कालमानानुसार पूर्वीच्या ठराविक सांच्याच्या स्नेहसंमेलनांतहि अनेक बदल होत गेले; आणि दूरदूरच्या प्रभावी पुढाऱ्यांचे, श्रेष्ठ साहित्यिकांचे आणि अनेक कलावंतांचे अशा प्रसंगीं मुद्दाम आमंत्रणपूर्वक झालेलें आगमन हे एक मोठें आकर्षण व औत्सुक्य होऊन बसले. त्यांतच नाट्यसंगीत-नृत्य इत्यादि कलांचा सांस्कृतिक कार्यक्रम द्वारां समावेश होऊं लागल्यानें त्यांचे स्वरूप निव्वळ शिक्षक व विद्यार्थी यांच्या पुरतेंच मर्यादित राहिलें नसून अनेक पालक व स्त्री–पुरुष वर्गाला या संबंधी अभिरुची प्राप्त झालेली आहे.

वा. क्र. ११४५०

अशा शालेय स्नेहसंमेलनांची सुरुवात शाळा–शाळांतून प्रथम क्रीडा संमेलनापासून होत असते आणि पुढें आंतरशालेय सामने, स्पर्धा इत्यादि कार्य सुरू होऊन शेवटी हा स्नेहसंमेलनाचा विधी पार पडत असतो.

ठराविक वार्षिक शिक्षणाच्या चाकोरींतून विद्यार्थी वर्ग मार्ग आक्रमण करीत असतांना अधूनमधून भरणारी ही क्रीडा–स्नेहसंमेलने त्यांतील कित्येकांच्या कला गुणांचा विकास होण्यास अनायासे वाव देतात. मुलांमुलींना मैदानी व मर्दानी खेळ, संगीत कथ्थक नृत्य, बांसरीवादन, नाट्य, हस्ताक्षरादि स्पर्धा, भेंड्या, रांगोळी आणि चित्रकला प्रदर्शन अशा अनेक काव्यगुणांचा परिचय होऊन त्यांत स्वत:चे नैपुण्य दाखविण्याची संधि मिळते. गुरुजनांकडूनच नव्हे तर समारंभास हजर असलेल्या अनेक प्रेक्षकांकडून त्यांच्या परिश्रमाचें कौतुक होत असते. प्रसंगी त्यांना बक्षिसेंहि वाटण्यांत येतात.

दरवर्षी प्राथमिक शाळांपासून महाविद्यालयापर्यन्त दरेक संस्थेंत होत असलेली ही स्नेहसंमेलनें आतां आपणा सर्वांच्या परिचयाची झालेली आहेत. आज मी मुद्दाम अशा स्नेहसंमेलनप्रसंगी नित्यश: घडणाऱ्या अवस्थेसंबंधी सांगावयाचें ठरविलें असून शाळा–कॉलेजांतील विद्यार्थीवर्गालाच नव्हे तर शिक्षक-प्राध्यापकांना सुद्धां ह्या प्रकारची गैरव्यवस्था किंवा प्रसंगीं घडणारा विस्कळितपणा याची वेळींच काळजी घेतल्यास कसा टळणारा आहे हें दिसून येईल.

प्रस्तुत विषयासंबंधानें लिहितांना लेखकाची भूमिका प्रेक्षकाची असून अलीकडे कित्येक स्नेहसंमेलनांत आढळून आलेले दोष व त्याचा एकंदर झालेला परिणाम याचे स्वत:ला आलेले अनुभव यावर आधारित आहे. त्यामुळें कोण्या एखाद्या व्यक्तीला किंवा संस्थेला दोष देण्याचा किंवा अतिरंजन करण्याचा लेखकाचा विचार नाहीं. हे प्रसंग आतां संमेलनाला हजर असणाऱ्या अनेक नागरिकांच्या परिचयाचे झाले असल्यानें व प्रसंगी त्यामुळें मोठाच विरस होत असल्यानें त्यांना महत्त्वाचे वाटतील एवढेंच नव्हे तर प्रस्तुत लेखकाच्या दृष्टींतून कांहीं सुटून गेलेल्या गोष्टींवर त्यांनीं प्रकाश पाडला तर ते अभिनंदनीयच ठरेल.

प्रत्येक शाळेंतून स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम निश्चित ठरविणारी एक समिति (व्यवस्थापक मंडळ) असतेच असते. आणि ही समीति एकंदर कार्यक्रम ठरवीत असते. पुष्कळ ठिकाणीं सभामंडपाची व्यवस्था ठेवतांना व्यासपीठ, निमंत्रित, पाहुणे मंडळी, प्रेक्षक, स्त्री-पुरूष वर्ग यांच्या बसण्याची जी व्यवस्था करण्यांत येते ती कित्येकदां मोठी जाचक असते.

एकदां एका संस्थेने महाराष्ट्राचे ख्यातनाम साहित्यिक ' अध्यक्ष ' म्हणून बोलाविलें. मंडपांतील व्यवस्था म्हणजे स्त्रियांना पुढें, मध्यंतरी प्रौढ पुरुष आणि पाठीमागें विद्यार्थी गण. स्त्रिया आल्या म्हणजे मुलें-अगदीं लहान मुलें पण आलीच. आणि तिथें रडणें, आक्रोश करणें इत्यादि बालिश चळवळी चालायच्या. वक्त्याचे भाषण ऐन रंगांत यायला आणि ह्या चळवळीला भयंकर स्वरूप प्राप्त व्हायला एकच वेळ आली. व सर्व श्रोत्यांचा अगदीं विरस झाला. वेळेवर ती परिस्थिती आटोक्यांत यायला स्वयंसेवकाचे प्रयत्न सुद्धां जागेच्या अभावी अपुरे पडले. अध्यक्षीय भाषण संपून परत घरीं जातांना बऱ्याच श्रोत्यांना वक्त्याचे भाषण नीट न ऐकूं आल्यानें मोठी चुटपुट लागून गेली. तेथील व्यवस्थेच्या दृष्टीनें चालक वर्गांनी वेळींच दक्षता घेतली असती आणि स्त्रीवर्गाला व्यासपीठाच्या दूरवर बसवायचे याचा आगाऊ अदमास घेतला असता तर हा प्रसंग अवश्य टाळतां आला असता व संस्थेच्या गैरव्यवस्थेसंबंधीं नांवें ठेवण्यास जागा उरली नसती.

तसेंच सुरुवातीच्या स्वागत-गीतासंबंधी पण सांगता येईल. प्रथम स्वागत गीतांतील अर्थ, चाल आणि म्हणणाऱ्या मुलामुलींची तयारी यावर खूपच परिश्रम घ्यावयास हवेत. नाहींतर गाणें एकीकडे व पेटी–तबला एकीकडे अशी स्थिति होत असते; त्यामुळें अगदीं सुरुवातीसच त्या संस्थेविषयीं प्रेक्षकाच्या मनांत निराळाच भाव उत्पन्न होत असतो, आणि बाहेरगांवाहून येणाऱ्या वक्त्याला पण जरा संकोचल्यासारखेच होत असते. या अशा गांवढळ सुरुवातीमुळें स्वत:बद्दल श्रोत्यांच्या मनांत निराळा भाव उत्पन्न होणार नाहीं याची कित्येक प्रसंगी वक्त्याला धास्ती पडते.

सन्माननीय अध्यक्षांचा परिचय करून देतांना सुद्धां नीट काळजी घ्यावयास हवी. त्यांच्या संबंधींची माहिती त्यांच्या पुढील कार्य, त्यांच्या

साहित्यकृति आणि कर्तृत्व या सर्व गोष्टी अचूक असाव्यात. प्रथमच पडताळून घ्याव्यात नाहींतर त्यामुळें व्यवस्थापकाचे किंवा परिचय करून देणाराचे व्यासपीठावर हंसे व्हावयाची पाळी येते. मला दोन संमेलनप्रसंगीं जो गंमतीचा अनुभव आला त्याचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाहीं. स्नेहसंमेलनाच्या चालकांनी त्यापासून इष्ट तो बोध घ्यावा.

" आतां मी आजच्या अध्यक्षांचा परिचय आपणां सर्वांना करून देणार आहे " असें सांगून एका मुख्याध्यापकानें अगदीं कहरच केला. वक्त्याचे गुण आणि त्याच्या साहित्यकृती यांत त्यानें स्वतःच्या (अ) ज्ञानाची भर घालून खूप " हंशा आणि टाळ्या " मिळवल्या. त्याच्या नसलेल्या साहित्यकृतीची वक्त्याच्या साहित्यसेवेंत भर घातली. आणि भारताबाहेर वक्त्यानें पाऊल टाकलें नसतांहि त्याला इंग्लंड व अमेरिकेंतून फिरवून आणले !

दुसऱ्या एका प्रसंगी मुख्याध्यापकानें हाताच्या मुठी वळवीत " आजके वक्ता बडे विद्वान है, व्यासंगी है, कार्यकर्ता है; असें ठांसून सांगितलें. "इस्से ज़ादा मुझे मालूम नहि; खूद वह अपने भाषणमे अपना परिचय कर देंगे." असें सांगून परिचय संपविला.

जी गोष्ट स्वागतगीतांच्या पूर्व तयारीची तीच सांस्कृतिक कार्यक्रमाच्या तालमीची; ही गोष्ट त्यांत भाग घेणाऱ्यांनीं व व्यवस्थापकांनीं नीट लक्षांत घ्यावयास हवी. एरवीं अंकाचा पडदासुद्धां नीट पाडला जात नाहीं. अंधाराच्या प्रवेशांत चक्क उजेड ठेवण्यांत येतो. लाऊडस्पीकरचे स्टँड यथास्थल न ठेवल्यामुळें नटांसमोर अनेकदां ऑपरेटरला मध्येच येऊन लुडबूड करण्याची पाळी येते (आणि तें अत्यंत वाईट दिसतें. ) भाषण पाठ नसल्यानें व प्रॉम्प्टिग कौशल्यानें कॅच करण्याचा सराव नसल्यामुळें नटनटींच्यासंभाषणाचा एकतर गोंधळ उडतो नाहीं तर प्रॉम्प्टिगच सर्वांना चक्क ऐकू येते ! ह्या सर्व गोष्टी रंगीत तालमी व योग्य निरिक्षण (Supervision) यामुळें सहज टाळण्यासारख्या आहेत. एका ऐतिहासिक नाटकांत गडबडीनें शिवाजी आपली तरवार स्टेजवर आणण्यास विसरून गेला " आणि शत्रुचे मी या तरवारीनें राईराई एवढे तुकडे करीन " या भाषणावर जेव्हां स्वारी येऊन ठेपली व कमरेला हात घालून पाहतों तो तिथें तरवारच

नाहीं व ती आंत कुठें होती ती सुद्धां सांपडेना आणि अशांत उभ्या मंड-पांत जो हलकल्लोळ उडाला तो कांही विचारावयास नको. अखेर अंकाचा पडदाच पाडावा लागला.

आतां बक्षीस समारंभासंबंधीं आपण पाहूं या. जवळ जवळ सर्वच शालेय संस्थांतून अध्यक्षांचे हस्तें बक्षीस समारंभाचा कार्यक्रम ठेवण्यांत येतो आणि तें सर्वतोपरी योग्यहि आहे; याबद्दल कुणाचेंच दुमत नाहीं. तो कार्य-क्रम आतांशा वक्त्याच्या भाषणापूर्वी त्यांचेच हस्तें ठेवण्यांत येतो.

आजकाल खेळाच्या नानाविध तऱ्हा प्रचारांत येत आहेत आणि इतक्या खेळांत प्राविण्य मिळणाऱ्या पहिल्या व दुसऱ्या नंबरच्या विद्यार्थ्यांना पारितोषकें द्यावयाची व त्यापायीं जो वेळ लागावयाचा त्याचा व्यवस्थापकानें अवश्य विचार करावयास हवा. व त्यांतील अंतर्गत योजना, बक्षिसांच्या वस्तू, त्यांची यादी, विद्यार्थ्यांना (ज्यांना बक्षिसें मिळावयाची आहेत) नीट व इष्ट स्थळीं बसविणें ह्यासंबंधीं अत्यंत चोखपणें व्यवस्था राखली गेली पाहिज. कित्येक ठिकाणीं विजयी विद्यार्थी सभामंडपाच्या एखाद्या कोपऱ्यांत दडी मारून बसलेले असतात आणि त्यांच्या नांवाचा पुकारा झाला म्हणजे अक्ष रशः ते श्रोतृगण तुडवीत, वाट काढीत व्यासपीठाकडे येतात तोंपर्यंत बिचाऱ्या अध्यक्षाला अक्षरशः ते बक्षिसाचें लोढणें हातीं सांभाळीत ताटकळत उभें राहावें लागतें. हे अगदींच वाईट आहे. व्यवस्थापकांनीं सर्वांत जास्त लक्ष या कामीं घातलेले असावें. बक्षिसें बहुसंख्येनीं वाटावयाची असल्यास कांहीं विशिष्ट बक्षिसेंच काय ती अध्यक्षांच्या हस्ते द्यावींत व नंतर उगीचच बक्षीस प्रदान समारंभाची कंटाळवाणी लांबड न लावतां फक्त नामोच्चार करावा. त्यामुळें अध्यक्षाला उगीचच उभें राहण्याची शिक्षा होते ती टळेल. श्रोतृगण मोठ्या औत्सुक्यानें अध्यक्षांचें भाषणासाठीं वाट पहात असतो त्याचे समाधान होईल व प्रसंगास चांगला सुटसुटीतपणा येईल. स्वयंसेवकाची सुव्यवस्था राखण्यांत कांहीं ठिकाणीं विशेष लक्ष न दिल्यानेंहि सभामंडपांत कित्येकदां गोंधळ होत असतो. वास्तविक समारंभांची सारी शान ह्या सुव्यवस्थेवरच असते हें न सांगूनहि कोणाला पटण्यास हरकत नाहीं.

शेवटीं 'वंदेमातरम्' गीताचे वेळीं सर्वांना घरीं जाण्याची जी घाई होते ती तशी करण्याचा अनिष्टपणा समुळ नष्ट व्हावयास हवा. शेवटच्या क्षणापर्यंत शांत रीतीने उभें राहून तितक्याच शांत रीतीने व शिस्तीनें सभामंडपाबाहेर जावयास हवे. स्वयसेवकांची खरी करामतसुद्धां याचवेळीं असते (आणि नेमकें याचक्षणीं ते कुठेंतरी दडलेले असतात) आणि परत जातांना श्रोतृवर्गाच्या कानांवर लाऊडस्पीकरमधून बहुधा खालील शब्द पडल्या शिवाय राहत नाहींत "स्वयंसेवक आणि कार्यकारी मंडळाच्या सभासदांनी कृपया करून सभामंडप खालीं होतांच सर्वांनी शिस्तीनें व्यासपीठावर जमावें. कोणीहि न विचारता घरीं जाऊं नये."

• • •

# ६ : मुलें आणि रोजनिशी

यंदा आमच्या वसतिगृहाला निर्मळ गुरुजी अधिक्षक (Superintendent) म्हणून लाभले; हें आम्ही आमचे मोठे भाग्य समजतों. फार चांगल्या व प्रेमळ स्वभावाचे; सेवाशील वृत्ती, धर्मशास्त्र, राजकारण यांचे त्यांना अगदीं प्रगाढ ज्ञान; आणि विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्राचा त्यांनी खास अभ्यास केलेला; त्यामुळें ते सर्वांना हवेहवेसे वाटल्यास नवल नाहीं.

गुरुजींनीं नुकतीच आम्हांला दररोज रोजनिशी लिहावयाची प्रथा घालून दिली आणि ती दर रविवारीं गुरुजींना दाखवावयाची. आम्हां विद्यार्थ्यांतहि कांहीं हौशी प्रवृत्तीचे विद्यार्थी तर कांहीं आळशी; कामचुकार आणि कमालीचे " Dont Care master " आहेत; आणि हे सर्वत्र चालायचेच. हाताची चार बोटें कोठेहि सारखी नसायची; तेव्हां आमच्यांत ही रोजनिशी दररोज लिहून काढण्याचा कंटाळा करणारेहि कांही विद्यार्थी त्यांत होते.

रविवारीं सकाळीं रोजनिशांचा गठ्ठा घेऊन आमच्या वसतिगृहांतला " नायक " मॉनिटर–ज्याला आम्ही त्याच्या " राठोड " व दणकट पण वेढब चेहेऱ्याला पाहून " मॅन–इटर " असें थट्टेनें म्हणत असूं–गुरुजींकडे

गेला; तेव्हां त्यांना त्या गठ्ठयांत कांहीं वह्या नुसत्या कोऱ्याच दिसल्या आणि कांहीं एखाद दुसऱ्या ओळीनें भरलेल्या. एकानें तर आपल्या रोजनिशींत असें चक्क लिहिले कीं "विद्यार्थ्यांच्या दररोजच्या जीवनांत एक ठराविक "तोच तो" पणा भरलेला आहे तेव्हां "तेंच तें" लिहून काढण्यांत काय अर्थ ? अतएव माझ्या रोजनिशीचीं पानें कोरी दिसतील याबद्दल क्षमस्व."

गुरुजींची विषय प्रतिपादनाची पद्धतच मुळीं अशी रसाळ, सुबोध आणि चटकन् मनाची पकड घेणारी होती कीं ठरलेल्या वेळेपूर्वींच सभागृहांत गर्दी झाली आणि आम्ही सर्वांनी गुरुजी येतांच त्यांना कोंडाळे करून घेरले. घरांतील वृद्ध आजीबाईच्या सान्निध्यांत गोड गोड गोष्टी अैकत बसावें त्या प्रमाणें या सभेला स्वरूप आले.

"रोजनिशी हा जीवनाचा आदर्श आहे. आपल्या आयुष्याच्या भूतकालांतील कृतकृत्याचा (मग ते बरें असो अगर वाईट) तो "आरसा" आहे; त्यांत प्रत्येकानें आपलें रूप न्याहाळावें, व गुणदोष बघून घ्यावेत." गुरुजींनी सुरुवात केली; "मलासुद्धां प्रथम रोजनिशी लिहिण्याचा कंटाळा होता. मला आपलं वाटे, रोजनिशी लिहावयाची म्हणजे काय? आपण म्हणजे असे कोण लागून गेलो आहोत कीं आपल्या आयुष्यांत दररोज कांहीं महत्त्वाच्या घटना घडणार आहेत; आणि ते नसल्यानें मग 'रोज सकाळीं उठलों, प्रातःर्विधि आटोपला, चहा घेतला, अंघोळ केली; अभ्यासास बसलों; नंतर जेवण करून शाळेला गेलों. शाळा सुटल्यावर सायंकाळीं व्हालीबॉल खेळलों, सायंकाळचे जेवण आणि अभ्यास संपवून झोंपी गेलों,' याशिवाय लिहून लिहून काय लिहिणार; फार तर एखाद दिवशीं गोड धड किंवा एखादा छोटासा सफरीचा प्रसंग—विशेषतः घरीं सुटींत गेल्याचा—यावर चार ओळी खरडायच्या. छट्. त्यापेक्षां ती रोजनिशी न लिहिली तरी चालेल; कशाला हवें हें कंटाळवाणें काम; आणि कितीतरी दिवस मी हें काम रेंगाळीत टाकलें. कधीं कधीं "हुक्की" येई; आणि आठ-पंधरा दिवस ती लिहून पुन्हां बंद; पण माझ्या बाल मित्रांनो! आतां मला वाटायला लागलं कीं मजजवळ त्या सर्व दिवसांची रोजनिशी असती तर त्यापैकीं कित्येक दिवसांच्या महत्त्वाच्या घटना टिपून ठेवतां आल्या असत्या. आणि आज त्यांचा कितीतरी उपयोग झाला असता. पण आतां दुःख करून काय फायदा? गेलेला वेळ पुन्हां कधीच

येणारा नसतो. आतां तुम्हीच बघा. येथें वसतिगृहांत आलां आहांत. आपल्या रोजनिशींत प्रत्येकानें आपल्या साहाध्यायांची एक संपूर्ण नांव, गांववार यादी तयार केली तर त्यावरून आपण ज्या जिल्ह्यांत राहात आहोंत त्या जिल्ह्यांतील अनेक गांवाहून जमलेल्या विद्यार्थ्यांचे हे एक संमेलन किती गोड वाटेल. आणि ज्यांचे गांव आपण पाहिलेलें नाही त्यांच्या गांवाविषयीं किती उत्सुकता वाटेल; प्रत्येकाच्या रोजनिशींत त्याच्या "गांवाकडच्या गोष्टी" असणारच आणि प्रत्येकाने आपापल्या रोजनिशा दुसऱ्यांना वाचावयास दिल्या तर मला खात्री आहे तो सर्व मनोरंजक इतिहास तुम्हाला अनेक पुस्तकांच्या वाचनाइतकाच गोड व सरस वाटेल. आपण वर्षभर येथें राहणार. तेव्हा त्या अवधींत येणारे २६ रविवार व २६ शनिवार आणि इतर सुटयांचे दिवस प्रत्येक विद्यार्थ्यानें कशा प्रकारें मौजेंत घालविले याची सहजच होणारी नोंद या रोजनिशांतून आढळेल आणि "काय बुवा. कालचा रविवार किनई अगदीं कंटाळवाणा गेला" असें म्हणण्याची पाळी तुम्हांला कधींच यावयाची नाहीं. शिवाय प्रत्येकाची रोजनिशी लिहिण्याची धर्ती व आपल्या शब्दांत कल्पना मांडण्याची पद्धत अनेकांना नानाप्रकारच्या कल्पना सुचवितील. शिवाय वर्गशिक्षकाच्या शिकविण्याच्या पद्धति व विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीशीं समरस होऊन त्यांना गोड रीतीनें मार्गदर्शन करण्याच्या प्रवृत्तीचीहि नोंद असल्या रोजनिशींतून आढळेल. "जोशी मास्तरांचा मराठीचा तास आणि त्यांतल्या त्यांत काव्यविषय विशद करण्याच्या पद्धती खरोखरच सुंदर आहेत. "यशवन्ता"ची "आई" असो. कै. माधव ज्यूलियनचे "नव लाख दिवे" असोत. प्रा. भ. श्री. पंडितांचा "अष्टमीचा चांद" असो, किंवा कै. कोल्हटकरांचे "महाराष्ट्र गीत" असो. त्यांतील खरा अर्थ तत्कालीन देश, परिस्थिति व समाजाचा दृष्टिकोन यांचें प्रत्यक्ष दर्शन घडते आणि मन कसं तल्लीन होऊन जातं. अशा शब्दपंक्ति आपल्या रोजनिशींतून दिसूं लागतील. शिवाय शाळांतून होणारे "पालकदिन", स्नेहसंमेलने यांच्याविषयींची वर्णनें आपण लिहिलेली असतील त्या त्या वर्षांत त्या शहरांतील कोणी ना कोणी पुढारी व प्रसिद्ध व्यक्ति आलेल्या असतील त्यांच्या मार्गदर्शनाची टिप्पणें आपण नाही का नोंद करणार? दिवाळीच्या व उन्हाळ्याच्या सफरींत 'मी माझी सुटी कशी घालविली' यासंबंधीं एखादा

निबंध लिहून काढण्याइतका विषय सुचेल. स्थानिक आणि आसमंतांतील प्रेक्षणीय स्थळें यांचेविषयीं स्वतःच्या दृष्टींतून दिसणारीं मनोहर दृश्यें इतस्ततः विखुरलेलीं दिसतील. त्यांचा इतिहास व पुराणत्व जाणून घेण्याची तुम्हांला उत्सुकता होईल; आणि आज एका वर्षांनीं लिहिलेलें हे सारे साहित्य आपण शांतपणें वर्षाअखेर वाचाल तेव्हां आपणांला ते वाचून एखादा चित्रपटच पहात आहोंत याचा अनुभव येईल व खरेंच आपण रोजनिशी ठेविली ही किती चांगली गोष्ट झाली असें आपणांस वाटेल."

थोडा वेळ थांबून गुरुजी पुढें सांगू लागले. "मी जेव्हां न्यायमूर्ति रानडे, टिळक, आगरकर, गांधी, पं. नेहरू" इत्यादिकांची जीवन चरित्रें वाचली तेव्हां मला खरोखरीच ह्या रोजनिशांचें महत्त्व पटूं लागलें. समज त्यांच्या जीवनांतील अशा महत्त्वांच्या घटनांची नोंद त्यांनीं स्वतः किंवा कुणाकडून करवून घेतली नसती तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व उत्तरोत्तर भारताच्या उत्कर्षाचे भव्यदर्शन घडले ते मुळींच आढळले नसते. मला माहीत आहे; माझे बालमित्र येथें म्हणतील कीं आम्ही असे कोण मोठे लागून गेलों आहोंत कीं आमच्या रोजनिशांवरून उद्या अशी उद्दात्त व भव्य चरित्रें लिहिलीं जावयाची आहेत; पण तो विचारच आपण सोडून द्या. मी आतांच सांगितले कीं वर्षभर ज्या वसतिगृहांत आपण रहात आहांत त्या काळांत घडणाऱ्या गोष्टींची नोंद तुम्ही आपल्या रोजनिशींत करून ठेवा व तीच प्रथा पुढें चालूं ठेवा. कुणास ठाऊक उद्यां तुमच्यामधून एखादा आदर्श विद्यार्थी थोर पुरुषांत मोडूं शकेल आणि इतःउपर आपणाला एवढें भाग्य लाभलें नाही तरी आपण ह्या रोजनिशीच्या लिखाणापासून कितीतरी गोष्टी शिकूं शकाल; कल्पनेने अनुभवलेले शब्दांनी लिहून काढण्याची अेक कला आपण सहज प्राप्त करून घ्याल. शब्दांनी लिहिलेलें नीट सुवाच्य, सुव्यवस्थित आणि कलात्मक लिहिण्याची हळुहळू आपणांस संवय जडेल. त्यांत उत्तरोत्तर मनोरंजकता आढळेल. एखाद्या चुकीची स्पष्टपणें आपण नोंद करून ठेवली तर त्या गोष्टीचा पुढें पश्चाताप होऊन आपणांला पुन्हां तशी चूक करण्याची इच्छा होणार नाहीं. शिवाय त्या त्या वेळीं घडलेल्या अनेक गोष्टींची नोंद होत गेल्यानें पुढें कांहीं माहिती आवश्यक असल्यास तिला अचुकपणें शोधावयास निव्वळ स्मरणशक्तीवर अवलंबून राहण्याचा त्रास पडणार नाहीं."

● ● ●

# ७ : मी व माझे गुरुजन

मी जेव्हां जेव्हां माझ्या बालपणच्या आठवणी नजरेसमोर आणतों त्यावेळीं माझं विद्यार्थी जीवन समोर उभं ठाकतं. ' रम्य तें बालपण ' या म्हणीप्रमाणंच " रम्य तें विद्यार्थीजीवन " असं जर कुणी म्हटलं तर त्यांत वावगं असं कांहीं होणार नाहीं. उलट त्या विद्यार्थी जीवनाच्या विशिष्ट कालाचा भावी आयुष्यावर झालेला परिणाम आणि त्यापासून मिळविलेले अनुभव त्या गत मनोज्ञ जीवनाची वारंवार आठवण करून देत असतात.

विद्यार्थी दशेंत आपणांला भेटलेल्या सर्वच गुरुजनांची कांहीं आठवण रहात नाही; त्यापैकीं कित्येक आठवणी अगदीं पुसट होत जातात. कांहीं प्रासंगिक म्हणून उल्लेखनीय असतात. पण कांहीं गुरुजनांचा व त्यांच्या एकंदर सहवास शिक्षणाच्या जीवनावर असा कांही परिणाम झालेला असतो कीं तो कांही केल्या मनासमोरून जात नाहीं. त्याची कोणत्या ना कोणत्या कारणांवरून नेहमी आठवण होत असते.

माझंच पहाना. मला विद्यार्थी दशेंत अनेक खोडचा करण्याची व शाळा चुकविण्याची संवय होती. कित्येक शिक्षकांनी मला छडीच्या जोरावर सरळ

आणण्याचा प्रयत्न केला; पण त्यामुळें माझ्या खोड्यांना खंड तर पडलाच नाही पण छडीच्या भीतीनं मी आणखी आणखी शाळा चुकवूं लागलों. त्याला आणखी दुसरीहि कारणें होती. माझं हस्ताक्षर अत्यंत वाईट होतं आणि पूर्वी शनिवारी सकाळीं बहुधा पुस्त्या वळावयाचं काम असे. माझ्या वाईट अक्षरामुळें माझे वर्गशिक्षक मला सारखे बडवीत. त्यामुळें मी पुढें शनिवारीं शाळेला सुट्टी घ्यावयाला लागलों. पण मला घरींहि राहतां येईना; कारण वडिलांचा धाक; अशा स्थितींत शाळेच्या जवळपासच्या गल्ल्या आणि बोळी हे माझे सकाळचा वेळ दवडण्याचें स्थान होऊन बसलें; पण हें किती दिवस चालणार ! एक दिवस ही गोष्ट उघडकीस आली. आणि वर्ग शिक्षकानें शाळेच्या चपराशाच्या साहाय्याने मला पकडलें आणि मुख्याध्यापकाकडे नेले. खरोखरीच आम्हांला त्यावेळी लाभलेले देशमुख मुख्याध्यापक इतके चांगले होते की त्यांनी माझी ती भेदरलेली थरथर कांपणारी व डोळ्यांतून अश्रू गाळणारी ती छोटी मूर्ति पाहून प्रेमाने जवळ घेतलें; आणि वर्गशिक्षकाला किंचित् रोषानेच आपल्या वर्गावर जावयाला सांगून माझ्याकडून अगदीं खरीखरी माहिती काढून घेतली. मी त्यांना सांगितलें ' सर, शनिवारीं हे मास्तर मला अगदीं बदडून टाकतात; त्यामुळें मी त्या दिवशीं गैरहजर राहतों व सोमवारीं जेव्हां मी पुन्हा येतो तेव्हां मला फक्त शनिवारीं न आल्याबद्दल दोनच छड्यांची शिक्षा होते. मुख्याध्यापकानीं मला अशा कांही गोड शब्दांत यापुढें शनिवारीं गैरहजर न राहण्याबद्दल सांगितले व स्वतः वर्गावर येऊन माझ्या उत्तरोत्तर सुधारत जाणाऱ्या अक्षरांवर इतके खूष होत गेले कीं माझा त्यांचे विषयीचा आदर दुणावला. मी त्यापुढें कधींहि शनिवारीं गैरहजर राहिलों नाहीं. वर्ग शिक्षकहि नंतर बरेच निवळले. प्राथमिक शाळेंत इतर अनेक शिक्षकांपेक्षां मुख्याध्यापक देशमुखांचा माझ्या मनांवर इतका विलक्षण पगडा बसला की आजहि त्या गत विद्यार्थी जीवनांतील दिवसांचें विस्मरण होत नाहीं. त्यांनीच पुढें मला साधारण बरें गातां येतें म्हणून शाळेच्या प्रार्थनागीताचे वेळीं इतर कांहीं मुलांत समाविष्ट केले. आणि ज्यावर्षी मी प्राथमिक शाळा सोडली त्यावर्षी म्युनिसिपल हॉलमध्यें गव्हर्नरांना कसल्या तरी प्रसंगावरून जें मानपत्र देण्यांत आलें त्या प्रसंगीं मी स्वागतगीत गाणाऱ्या मुलांत तिसरा नंबर होतों.

आज मी त्या शनिवारीं बंडविणाऱ्या शिक्षकाशी मुख्याध्यापक देशमुख यांच्या स्वभावाशी तुलना करतों; त्या वेळीं बाल मनोवृत्तीच्या त्यांच्या अचूक निरीक्षणाबद्दल व विद्यार्थ्यांना इष्ट वळण लावून व प्रोत्साहन देऊन योग्य मार्गाला लावण्यासंबंधीचे त्यांचें धोरण पाहून आदर दुणावतो.

गाण्यानंतर गव्हर्नरांच्या हस्तें मिळालेला काळा चकचकीत रूळ, इंग्रजीचें पहिलें रीडर आणि खाऊचा पुडा ही देशमुख मुख्याध्यापकांच्या मजवरील लोभाचें व इष्ट मार्गदर्शनाचें मी प्रतीक समजतों.

इंग्रजी शाळेंत ज्यावेळीं पदार्पण केलें त्यावेळीं बराच समज आला होता. बक्षिसाच्या लालुचीनें किंवा वर्गातील हुशार विद्यार्थ्यांच्या सहवासानें तसेंच कांही शिक्षकांच्या अभ्यासांत नेहमी चुरस लागलेली असावयाची. अर्थात त्याचा परिणाम अगदीं तिमाही पासून आपले नंबर पहिल्या पांचांत बसतील अशाच धर्तीनें अभ्यासांत होई. घरीं आईवडिलांना "अभ्यास कर" असें ह्मणण्याची कधीं पाळी येईना. आणि कांही शिक्षकांच्या सुयोग्य शिस्तीमुळें व प्रेमळ शिकवणीने आम्ही नेहमीच शाळेंत रंगलेले असूं. जावरखेडकरांचा इंग्रजीचा तास, सोमण मास्तरांचा मराठी विषय, यादेगारबेग मास्तरांचें सायन्स, भागवतांचें संस्कृत आणि आणि उपदेव गुरुजींचा भूगोलाचा तास–आजहि सारे सारे आठवत आहे. ते केवळ त्या त्या शिक्षकांच्या प्रेमळ शिकवणीमुळेंच. आम्हीं शाळेंत चुकत नसूं किंवा वर्गात कधीं मागें राहत नसूं अशांतला भाग नव्हता. Stand up on the bench आणि Get out of the class ह्या शिक्षाहि आम्ही कित्येकदां भोगल्या. मुलांच्या आणि माकडांच्या खोड्या आणि उनाडक्या करण्याचा जन्मजात गुण सहसा कांहीं जात नसतो. त्याला आम्हीच कसे अपवाद राहणार ? पण अशा बाबतींत आम्ही " बंडखोर " म्हणून कधींच झळकलो नाहीं. जरा थोडी " चिरिमिरी " किंवा ' कानपिचकी " मिळाली की सरळ येत असूं पण उपरोक्त गुरुजनांच्या एकंदर वागणुकीमुळें मनावर असा कांहीं परिणाम होत असे कीं "आपण तसा रागावण्याचा " चान्सच " कशाला द्या शिक्षकाला " अशी कांहीशी प्रवृत्ती होऊन गेलेली होती. त्यामुळेंच कित्येकदां कांहीं वर्गशिक्षकांना त्यांच्या बदलीमुळें किंवा वार्षिक परिक्षेनंतर वर्ग

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
32223 दि: 19.9.51

बदलून सोडून जातांना आम्हाला अत्यंत वाईट वाटायचें; आणि डोळ्यांत पाणी तरळायचे.

विद्यार्थीजीवनांतील कांहीं मनोज्ञ आठवणीहि अजून विसरलेल्या नाहींत. ज्या ज्या वेळीं मन विद्यार्थी दशेंतील त्या काळांत भ्रमण करूं लागते त्या त्या वेळचे प्रसंग जसे कांहीं आपण नुकतेच उपभोगलेले आहेत असें वाटते.

शाळेंत उशिरा यायची संवय बहुतेक सर्वांनाच होती. पण एका वर्षीं सोवनी नांवाच्या शिक्षकानीं जी योजना काढली त्यामुळें ती बरीच निवळली. तत्पूर्वी अशी पद्धति असे की प्रत्येक वर्गांतून उशिरा आलेली मुलें क्रमवार मुख्याध्यापकांच्या खोलींत वर्ग शिक्षकानें आणून प्रत्येकाला एकेक छडी द्यावयाची; व हें रोजचें आणि वर्षानुवर्ष होऊन गेलें होतें. त्याचे कुणालाच कांहीं वाटेना. पण सोवनी मास्तरांनी आपल्या " ड्रॉइंगच्या " कौशल्यानें उशिरा आलेल्या विद्यार्थ्यांना सजवून त्यांची शाळाभर गळ्यांत पाटी अडकवून जी धिंड काढावयाची योजना काढली त्यामुळें विद्यार्थी अगदी शरमून जाऊं लागले आणि हळुहळू उशिरा येण्याची त्यांची प्रवृत्ति बरीच निवळली.

आमच्या बरोबर नारायण नांवाचा एक विद्यार्थी होता. त्याला नेहमीं शाळेंत गैरहजर राहण्याची संवय. वर्गशिक्षकानें बरेच उपाय योजले पण कांहीं सुधार होईना, आणि सबबी तरी तो अशा कांहीं सांगायचा की सारे थक्क होऊन जायचे.

एकदां त्यानें बहिणीला भूत झोंबले त्यामुळें मांत्रिक वगैरे आणून तिला शुद्धीवर आणण्यांत बराच वेळ झाला म्हणून तो लवकर शाळेंत येऊं शकला नाही हें एक नवेंच कारण रसाळ भाषेंत सांगितलें. शिक्षकाला तें खरेंच वाटलें.

जेव्हां नारायणाला यावर कांहीच शिक्षा झाली नाही असे नारायणाच्या शेजारीं बसणाऱ्या व त्याच्याशीं न पटणाऱ्या विद्यार्थ्यानें पाहिलें व तो उठून म्हणाला, " सर, नारायण खोटें सांगतो. तुम्ही वाटल्यास चौकशी करा. नारायणाला बहिणच नाहीं मुळीं. "

हा सर्व प्रकार राऊंडवर आलेल्या पण कुणाला न कळत आडोशाला उभे राहून ऐकत असलेल्या केळकर मुख्याध्यापकांनी पाहिला. त्यांनीं वर्गांत प्रवेश करतांच सर्व मुलें उभी राहिलीं. त्या सर्वांना बसावयास सांगून

नारायण व त्याची चुगली करणाऱ्या त्याच्या शेजारच्या विद्यार्थ्याला जवळ बोलाविलें. प्रथम त्यांनी त्या चुगली करणाऱ्या विद्यार्थ्याची खूप निर्भत्सना केली व ही संवय अत्यंत वाईट आहे असें सांगून नारायण कधींच खोटे बोलणार नाहीं असें ते म्हणाले. आम्हा विद्यार्थ्यांनाच नव्हे तर वर्ग शिक्षकालाहि मुख्याध्यापकाच्या अशा बोलण्यानें आश्चर्य वाटलें. थोडा वेळ थांबून मुख्याध्यापकांनी उशिरा येण्याबद्दल व खोटें बोलण्यापासून होणारे तोटे यांवर पांच मिनिटें असा कांही उपदेश केला कीं त्या अभंड (!) नारायणाला तो पटून आपणहून त्याने आपला गुन्हा कबूल केला व पुन्हां असें करणार नाहीं अशी ग्वाही देऊन अक्षरशः मुख्याध्यापकाचे त्यानें पाय धरले. त्या दिवसानंतर तो कधींहि फारसा गैरहजर राहिला नाही. छडीच्या सतत शिक्षेपेक्षां बालमनाला पटणारा प्रेमळ उपदेश किती प्रभावी ठरतो हें त्या प्रसंगावरून आम्हांला कळून चुकले. शाळेच्या चौफेर आवारांत जसें हे शिक्षकाचे सान्निध्य लाभलें तसेंच उघडचा मैदानावर खुले खेळ खेळतांना त्यांचा अनुपम आनंद चाखता आला. फुटबॉलच्या खेळांत ड्रिलमास्तर कुळकर्णी बव्वा, मेहबूब, बोरकर आणि देवांग हे सहाध्यायी मला लाभले होते आणि आमचा हा ग्रुप नाही म्हटले तरी पांच वर्षं सारखा टिकून होता. क्रीडांगणावर आम्ही पांच पांडवासारखे श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनाखालीं शोभत असूं. दरवर्षीं स्थानीय आणि परगांवी होणाऱ्या 'मॅचेस' मध्ये आमची ही जोडी क्रीडांगणावर उतरली म्हणजे खेळाला आणि खेळ पाहणाऱ्याला असा कांही हुरूप यावयाचा कीं सभोवतील वातावरण "हंशा आणि टाळचा" नी नुसते गर्जून जावयाचे. त्या पांच वर्षांत आम्हांला फारतर एकदोनदांच अपयश आलें असेल. ड्रिलमास्तर कुळकर्णी यांचें एकंदर निरीक्षण व सांकेतिक मार्गदर्शन असें कांहीं अचूक असे कीं प्रतिस्पक्षावर आम्ही 'हॉफ टाईम' मध्यें एकतरी गोल केल्यावाचून राहिलों नाही.

मला क्रिकेटचा खेळ मात्र कधींच जमला नाहीं व "प्रथम ग्रासे मक्षिका पातः" या न्यायाने जेव्हा माझ्या टाळक्यांत सुरुवातीला एक चेंडू बसला त्यानें तर पुढें चुकून मी त्या खेळाला हात घातला नाही. गमतीनें सांगायचें झाले तर तो खेळ आजहि पहावयास जातांना एखाद्या ओव्हर बाउंड्रीचा चेंडू कदाचित आपल्या डोक्यांत तर येऊन बसणार नाहींना अशी मनांत शंका

येऊन जाते. हॉकीच्या खेळांत मात्र तेवढी प्रगति नव्हती तरी एकदां मुख्य गोलकीपरचा नियुक्त गडी अकस्मात आजारी पडल्यानें मला तेथें ठेवण्यांत आले आणि त्याच दिवशीं इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स मॅच बघायला आले ते सुद्धा खेळले. सुदैवानें किंवा कशाने तरी म्हणा त्यांचा अगदीं गोल होणारा चेंडू मी असा कांही हुकविला कीं ते एकदम मजकडे धावून आले व त्यांनी मला वर उचलून धरून प्रेमाने " वेल, व्हेरी गुड, ब्रेव्हो, माय डिअर गोलकीपर " म्हणत शाबासकी दिली.

" युद्धस्य कथा रम्या " अशी एक संस्कृतांत म्हण आहे तीच विद्यार्थी जीवनालाहि लागू पडेल. अनेकांच्या विद्यार्थि जीवनांत नानाविध प्रसंग घडलेले असतील आणि त्यांच्या सुरस अनुभवांचा केवढा तरी संग्रह होईल. शालेय जीवनांतील कित्येक प्रसंगहि मनावर कायमचा ठसा देऊन जातात आणि त्यामुळें गुरुजनांच्या निकट सहवासांत येण्यामुळें जो लाभ होतो त्याचीहि गोडी कांही और असते.

विद्यार्थी जीवन संपल्यानंतर भावी आयुष्यांत व्यवसायामुळें निराळ्या क्षेत्रांत येऊन पडलो असलो तरी तो विद्यार्थीदशेंतील काळ व त्या काळांत मिळालेले माझ्या गुरुजनांचे मार्गदर्शन अनेक दृष्टींनी आजच्या जीवनांत अत्यंत उपयुक्त ठरलेले आहे. शाळेला उशीर करून कधीं जाण्याची संवय नसल्याने कचेरीला जातांना सुद्धां वक्तशीर जाण्याकडे मन:प्रवृत्ती असते. कांहीं शिक्षकांची टापटीप व सुव्यवस्थितपणें राहण्याचा परिणाम आपल्या अंगवळणी पाडून घेतां आला. " शिस्त आणि तिचें महत्त्व " यांचे जे बाळकडू मिळाले त्याचा पण भरपूर उपयोग करून घेतां येतो. उगीचच चोरी, चहाडी-लबाडी, करण्याच्या संवयीपासून विद्यार्थी दशेंत अलिप्त राहतां आल्यामुळें त्या नंतरच्या दररोजच्या जीवनांत असल्या अवगुणांना मुळींच प्रवेश मिळाला नाही. स्वच्छता, शुद्धता, वक्तशीरपणा, मितभाषित्व, प्रेमळ संभाषण या प्रत्येक सद्‌गुणांमागें विद्यार्थी जीवनांत येऊन गेलेल्या अनेक गुरुजनांच्या प्रेमळ प्रतिछाया वावरत असल्याचा मला अजूनहि भास होतो आणि त्यांची आठवण झाली म्हणजे त्यांच्या अस्पष्ट मूर्ति नजरेसमोर उभ्या राहून विनम्रतेनें मस्तक त्यापुढें " नत " होते.

**केवढी अभिमानाची गोष्ट ही ! केवढे थोरपण ह्या गुरुजनांचे !**

## ८ : विद्यार्थीजीवन आणि पत्रानें मैत्री

वसतिगृहाच्या वाचनालयातर्फें आज प्रो. विद्याधर यांचे "पत्रानें मैत्री" या विषयावर "प्रात्यक्षिक व्याख्यान" होते. प्रो. विद्याधर वाडेकर हे त्याच वसतिगृहांत राहत असत व त्याच शाळेंतून शिक्षण संपवून त्या वर्षाच्या मॅट्रिकचे वर्गांतून साऱ्या मध्यप्रदेशांतून त्यांनी पहिला क्रमांक पटकाविला होता. पुढें तो कॉलेजांतहि कायम ठेवून मराठीचे नामकृत प्राध्यापकत्व त्यांनी भूषविलेलें होते.

शाळेतर्फे त्यांचा आज सकाळीच गौरव झाला होता. आणि वसतिगृहातर्फे त्यांना दुपारी मेजवानी देण्यांत आली होती. आतां चार वाजता चहापानानंतर मुद्दाम त्यांचें उपरोक्त विषयावर व्याख्यान ठरविले होते. रविवार हा सुटीचा दिवस, शाळेचा अेक ऋणानुबंधी या नात्यानें मला निमंत्रण पत्रिकाहि आली होती, तेव्हां सहज जाऊन बसण्यास हरकत नाही म्हणून मी तिकडे वळलों.

माझ्यापुढें मात्र या निमित्तानें तीन चार वर्षांपूर्वीचा अेक छोटासा प्रसंग उभा राहिला. 'बालसन्मित्र' किंवा अशाच कोणत्याशा नियतकालि-कांत "पत्रानें मैत्री" हे अेक सदर येत असे; आणि लहान मुलें आपला

जास्तींत जास्त मित्रपरिचय व्हावा या दृष्टीनें आपले नांव नोंदवून कांहीं काळ पत्रव्यवहार करीत; मला नीट सांगता आले नसले तरी बालमनाची ती उत्सुकता, स्वतःचें छापून आलेले नांव आणि वर्ष सहा महिने दहापांच मित्रांची आलटून पालटून येणारी पत्रें आणि पुढें या सर्वच गोष्टीचा विसर, इतकेंच महत्त्व या गोष्टीला होते. आणि ते माझ्या प्रत्यक्ष मुलाच्या अनुभवावरून मी सांगू शकतों.

केव्हां तरी तो हायस्कुलांत असतांना त्याला ही "पत्रानें मैत्री" जोडण्याची आवड व आवश्यकता भासू लागली असावी. अेकदां त्याचेजवळ पत्रव्यवहारासाठीं पैसे नव्हते म्हणून त्यानें मजकडे दीड आण्याची मागणी केली. मजजवळ त्यावेळीं पैसे नव्हते म्हणून नव्हे तर असले "फालतु धन्दे" न करण्याबद्दल मुलांची चांगली कान उघाडणी करण्याची चालून आलेली संधि दवडू नये म्हणून मी त्याला रागावून बरेंच बोललों आणि तो बिचारा हिरमुसला होऊन बाजूला झाला.

वडिलापुढें मान तुकवावी लागली तरी आईसारखें प्रेमळ अस्त्र हातीं असल्यानंतर मुलांच्या महत्त्वाकांक्षेस कांही उणे पडत नाहीं.त्यानें तिजजवळून "रडून पडून" सहा पैसे पटकाविले आणि आपला कार्यभाग साधला. पुढें उन्हाळयांत त्याचा "पत्रानें मैत्री" चा सपाटा सुरू झाला. शाळेला सुटीच होती; पण त्याला लागणारे भांडवल तो कुठून मिळवितो याचा मला छडा लावावा लागला; चौकशी अंती वर्षाअखेरच्या रद्दींतून ती मिळकत उभारली गेली हे ऐकून मी स्वस्थ बसलों व पुढें ती गोष्ट विसरूनहि गेलों. पण परवां जेव्हां तो कॉलेजांतून सुटींत घरीं आला तेव्हां सहज मी त्याला विचारलें तेव्हां तो म्हणाला "कसलं काय अण्णा; चार दिवस मी लिहिलीं हीं पत्रं; कुणी उत्तरं देत; कुणी आळस करीत; नंतर मी पण आळस करायला लागलों आणि दिलं सोडून. आतां फार फार तर अेखाद् दुसऱ्या मित्राला कधीं कधीं लिहीत असतों मी; पण ती त्यांच्या पत्रांची व त्यावरील एकदोन पुनःस्मरणाची (Reminders) उत्तरं म्हणून आणि एखादे वेळीं घरीं "बहुधा पैसे संपले म्हणजेच अगत्याने–" मी मध्यें उद्गारलों.

त्यावर त्याची आई–कुठं तरी दार आड आमचें संभाषण अैकत असावी– पुढें येऊन हंसत हंसत व मोठाले डोळे करीत म्हणाली "नाहीतर–

उगाचच मुलांना उणें पाडून बोलण्याची इकडची संवय कांहीं अजून जात नाहीं. जा रे मधू फिरायला. ''

तो सर्व प्रसंग माझ्या नजरेसमोरून सरकून गेला. आणि आतां हे प्रो. विद्याधर त्यावर ''प्रात्यक्षिक व्याख्यान'' देणार हें पाहून माझ्या मनापुढें त्यांचे न पाहिलेले वडील; त्यांची ती क्रुद्ध मुद्रा; मित्रांच्या पत्रांची ती एक चळत आणि खाली मान घालून शिव्या खात असलेला केविलवाणा विद्याधर; अशा अनुभवाचे एक चित्र उभें राहिले.

समारंभाचे सर्व प्राथमिक सोपस्कार व्यवस्थितपणें पार पडले आणि प्रो. विद्याधर बोलावयास उभे राहिले. टाळ्यांच्या गजरांतच त्यांनी त्यांच्या पाठीमागील भव्य काळचा फळ्यावरील आवरण दूर केलें आणि तेथें अनेक पत्रें, भेटी, पुस्तकें आणि नियतकालिकांतील कात्रणें तसेंच परदेशांतील मासिकांत आलेली प्रो. विद्याधरांची व अनेक देशांतील सुंदर सुंदर स्थळांचीं छायाचित्रें दिसूं लागली. अगदीं प्रथम दर्शनीच त्यांच्या आजच्या विषयाला अनुलक्षून अशी त्या वस्तूंची मांडणी होती, असा कुणाचाहि ग्रह झाला असता.

आणि प्रो. विद्याधरांचे ते हंसतमुख प्रसंगीं आवेशपूर्ण व विनोदमिश्र भाषण आणि त्यांतील सुंदर विवेचन ऐकून तर सारें सभागृह अगदीं मंत्र-मुग्ध झाले. एवढ्याशा साध्या व सामान्य विषयांत इतका आशय, इतकें महत्त्व व इतकी गुणग्राहकता असूं शकेल असें तोंवर मला कधींच वाटलें नाहीं. मी बसल्या बसल्या स्वतःचीच निर्भत्सना करूं लागलों. एवढ्यावरच मी थांबलों नाही तर माझें एक मन त्यावेळीं माझ्या मुलाचा—मधुचा असा निरुत्साह केल्याबद्दल स्वतःच्या दोन थोबाडांत मारून कां घेऊं नये असें सांगू लागलें.

प्रो. विद्याधरांनी सुरवातीच्या अडचणीं, घरच्या वडील मंडळींचा विरोध, पत्रव्यवहार करण्यासाठीं लागणारे पैसे व ते मिळविण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या खटपटी आणि मिळविलेले मित्र कायम ठेवून त्यांत वृद्धि कशी केली ते सविस्तर सांगितले.

ते पुढें म्हणाले ''मी एवढ्यावरच थांबलों नाहीं. तर हळूहळू प्रांत, परप्रांत, देश, परदेश, आणि आतां जवळजवळ जगांतील साऱ्या विभागांतून

वाढलेला भिन्न परिवार, त्यांचे परस्पर संबंध व सद्भाव यासंबंधी किती तरी आठवणी सांगण्यासारख्या आहेत. युरोप, आफ्रिका, जर्मनी, चीन, ऑस्ट्रेलिया, जपान, अमेरिका, रशिया इतकेंच नव्हे तर छोटीछोटी अरब, इराण, तुर्कस्थानसारखी राष्ट्रें व छोटे छोटे देश यांतून हा मित्र-मैत्रिणीचा—बालबालिका, प्रौढ युवकयुवती, आणि अनेक पितृतुल्य, मातृतुल्य, भ्रातृतुल्य नरनारींचा संच विखुरलेला आहे. निव्वळ त्यांच्या पत्रांतील ओळीमधून त्यांची संस्कृति, विचार धारणा, देशपरिस्थिति, सौंदर्य स्थळें, कांहींची छायाचित्रें, अनेक वस्तूंच्या भेटी, ऐतिहासिक स्थानांची तशीच निसर्गरम्य नद्या–पर्वत, सरोवरें, वनश्रींचीं वर्णनें किती किती गोष्टींचा एक विशाल चित्रपट माझ्या नजरेसमोरून पुढें सरकत आहे. हिमालय–हृषीकेशचे हे दोन मित्र रामेश्वर–कोलंबोच्या मित्रांशी आणि पुण्या–मुंबईचे मित्र कलकत्ता--शान्तिनिकेतनच्या मित्रांशी अगदीं समरूप झालेले या पत्रलेखनांतून ओळीमधून दिसून येतील. लंडनच्या डेविस मेरी या ब्राऊनिंग स्ट्रीट नं. २ वरील दांपत्यांच्या छोट्या लिलीने पाठविलेल्या परवांच्या ख्रिसमसच्या कार्डावरील सदिच्छा व सद्भावनांनीयुक्त अशा कवितेच्या ओळी तिच्या स्वतःच्या असून त्यांमधून बालमनाचा हृद्य व मनोरम विकास झालेला आढळून येईल. वॉशिंग्टनच्या एका मित्रानें आपला नायगाऱ्याच्या धबधब्यावर घालविलेला "सचित्र ख्रिसमस" किती आनंददायी वाटत आहे बघा. मोंबासाच्या ह्या माझ्या हिंदी वैमानिक मित्रानें आफ्रिकेच्या घनदाट अरण्यांत अपघात झाल्यामुळें आपली व सहकाऱ्यांची अगदीं अक्षरशः वाघांच्या जबड्यांतून कशी सोडवणूक करून घेतली हें वर्णन हें पत्र सांगू शकेल. नेताजी सुभाषचंद्र बोस ज्या वेळीं जपानांत आले होते त्या वेळीं त्यांच्या सहवासांत कांहीं क्षण घालविलेल्या योशिन फू या कॉलेजकुमारिकेनें त्यावेळच्या प्रसंगावर केवढा तरी प्रकाश पाडला आहे. चीनमधील प्रचलीत चळवळीसंबंधीं पेकिंग येथील बालवीरपथकाचे प्रमुख श्री. चांग–ल्यु–त्सेन यांनी कळविलेली माहिती किती हृदयंगम आहे. किती किती सांगू अशा या आठवणी पत्रानें जोडलेल्या मैत्रींतून.

आमच्या मित्रपरिवारांच्या पत्रव्यवहारांतून निव्वळ व्यक्तिगत, ऐतिहासिक, निसर्गरम्य किंवा प्रासंगिक अशा विषयावरच भर दिलेला नसून

तेथील सामाजिक, धार्मिक राजकीय आणि सांस्कृतिक विषयांचाहि उहापोह केलेला आढळून येईल.

माझ्या कित्येक मराठी कृतींना माझ्या मित्रांनी फ्रेंच, इंग्रजी, जपानी, व जर्मनी पेहराव दिलेला आपण या फळचावरील प्रदर्शनांत पाहूं शकतां. तसाच त्यांच्या भाषेंतील सुंदर साहित्याला दिलेला मराठी पेहेराव आपण इकडील कित्येक नियतकालिकांतून वाचलेला असेलच.

या सर्व गोष्टीवरून आपण " पत्रानें मैत्री " या छोटयाशा विषयांतील मोठें महत्त्व जाणूं शकता. विद्यार्थी दशेंत प्रस्तुत गोष्टीचें बीजारोपण होणें अत्यंत आवश्यक आहे. आणि आजचा विद्यार्थीवर्ग जसजसा मोठा होत जाईल तसतशी निश्चयानें महत्त्वाकांक्षेनें व सतत प्रयत्नानें त्यांनीं ही पत्रानें जितकी जास्त वाढू शकेल तेवढी मैत्री वाढवावी; पत्रव्यवहाराला लागणारा चिमुरडा खर्च ही बाब कांहीं फार मोलाची नाहीं. आजचा विद्यार्थीवर्ग कांहीं जुन्या बुरसट व संकुचित वृत्तीचा राहिलेला नाहीं.

जेथें पदवीधर बुटांना पॉलिश लावून, वृत्तपत्रें विकून, एजन्सीज घेऊन उदरनिर्वाह करूं शकतात तेथें सामान्य विद्यार्थ्यांनी या गोष्टीचा एवढा बाऊ करण्याचें कांहीं कारण नाहीं."

"मला एकदां"— प्रो. विद्याधर सांगूं लागले " एडिंबर्गच्या ए. एम. मार्गन या विद्यार्थ्याला एअरमेलनें एक जाडजूड पाकीट पाठवावयाचे होते पण त्यावेळीं त्याला लागणारे तीन रुपये दोन आणे मजजवळ नव्हते. एक आठवडयाच्या करारानें मी रात्री एका हॉटेलांत हिशेब तपासनीसाचे काम मिळवून सहा रुपये दोन आणे मिळविले व त्यांतून हें काम भागविले. बरेच काम तुम्ही काटकसरीनें व अल्पबचत पद्धतीनें करूं शकाल.

लहान वयांतील पत्रमैत्री पुढें मोठें झाल्यावरहि टिकविली तर आपल्या भावी आयुष्यांतील अनेक अनुभव अत्यंत मोलाचे ठरतील.

ऑक्सफर्ड विश्वविद्यालयांतील गोष्ट मी सांगतों. तेथील कॉलेजांत शिकत असलेला मि. इ. ओ. थॉमस नांवाचा विद्यार्थी मी ज्यावेळीं इकडे कॉलेजांत शिकत होतो त्यावेळपासून पत्राने मैत्री जोडलेला प्रोफेसर झाला. कोणत्याशा विषयांत 'डॉक्टरेट' पण मिळविली त्यानें. आमचा पत्रव्यवहार अखंड चालू होता.

गतवर्षी एका कॉलेजांतील स्नेहसंमेलनाचें अध्यक्षस्थान मला देण्यांत आले; व "इंग्रजी वाङ्मयांतील जुने व नवे नाटककार" या विषयांवर बोलण्याची पाळी आली. नशीब माझें कीं मला हा विषय बराच आगाऊ सुचविण्यांत आला होता. कॉलेजच्या आणि युनिव्हर्सिटीच्या वाचनालयांतून वरील विषयांवर कांहीं ग्रंथ होते; नाहीं असें नाहीं; पण त्यांतून सखोल व अद्यावत माहिती मिळणें दुरापास्त; मला चटकन् वरील मित्राची आठवण झाली. आणि लगेच त्याला माझी अडचण कळविली. त्यानें सुद्धां तितक्याच तत्परतेनें मला हवी असलेली माहिती उलट टपाली पुरविली; अर्थात् माझें ते व्याख्यान इतके रंगले व गाजले कीं जो तो माझ्या दीर्घ परिश्रमाची, अभ्यासू वृत्तीची आणि मार्मिक रसग्रहणाची वाखाणणी करूं लागला. थोडक्यांत साध्याशा "पत्रानें मैत्री" मुळे माझें केवढें कार्य साधले गेले हें लक्षांत येईल.

केवळ विद्यार्थ्यांनीच पत्रानें मैत्री जोडावी आणि वृद्धिगत करावी असे नव्हे तर प्रौढ स्त्री–पुरुषांनी लक्ष घालून शक्य तेवढा पत्रव्यवहार करावा. नवे मित्र–मैत्रिणी जोडावेत आपले अनुभव त्यांना कथन करावे; त्यांचे जाणून घ्यावे; सलोखा निर्माण करावा आणि हा सर्व संग्रह जपून ठेवावा. कधींकाळीं आपणांस करमेनासे झाले तर तो संग्रह घेऊन वाचून काढा आणि मग पहा; त्यापासून मनाला केवढा आत्मिक आनंद होतो तो. तें समाधान शब्दांनी कथन करण्याजोगें नसते. आज मला पत्रानें मैत्री जोडल्यामुळें जो एक विशाल विश्वबंधुत्वाचा विशुद्ध व सात्विक आनंद चाखावयास मिळत आहे त्याचें सर्व ऋण मी ही मूळ कल्पना ज्या कुणी थोर व्यक्तीनें काढली असेल त्याच्या सेवेशीं रुजू करून आपला निरोप घेतों."

टाळयांचा गजर झाला. पानसुपारी संपली; उभे राहून "वन्देमारतम्" गीत गायिले गेलें; पण माझ्या दृष्टीसमोर मी, माझा मुलगा मधु, त्याची आई, विद्यार्थ्यांचा मेळावा, प्रो. विद्याधर आणि त्यांच्या कल्पनेंत सामावलेले व पत्रानें मित्र जोडणारें सारें विश्व आणि केवढा तरी पत्रांचा ढीग एखाद्या चलत् चित्रपटाप्रमाणें सारखा तरळत होता.

● ● ●

# १ : आदर्श विद्यार्थ्यांची अभ्यासिका

शाळा सुटली. " विद्यार्थ्यांची अभ्यासिका कशी असावी " ह्या विषयावर लिहावयाला दिलेल्या निबंधांचा तो गठ्ठा बगलेंत मारला आणि नित्याप्रमाणें घरीं परतलों. घरीं आलों कीं चहा घ्यायचा. घरीं कांहीं ' हवं–नको ' ची चौकशी करायची; आणि बाजारांत जायची पाळी नसली कीं गांवाबाहेर दूर मोकळ्या माळावर फिरावयास जायचं. दिवसभराचे सर्व परिश्रम तेथें परिहार होत. मनाला प्रसन्नता येई. घरी आलों कीं जेवणहि गोड लागे. आणि सांसारिक काव्यशास्त्रविनोदांत थोडा वेळ घालवून झोपी जायचं अगदीं पहाटेला उठायचं; चूळ भरायची आणि शाळेंतून घरीं आणलेलं काम पुढ्यांत घ्यायचं ते संपेस्तोंवर सकाळीं उन्हें वर येत; चहाची वेळ व्हायची; नंतर सकाळची कामें; अेखाद दुसरी शिकवणी, स्नान आणि जेवण कीं लगेच शाळा. शिक्षकाच्या जीवनांत यापेक्षां अन्य अशी कोणती घडामोड होणार ?

आजहि घरीं येऊन पोंचलों. टेबलावर वह्यांचा गठ्ठा ठेवला; सौ. ने गार पाण्याचा तांब्या आणि गरम चहा आणून ठेवला त्या दोहोंचाहि अनुक्रमें समाचार घेत कांहीं " हवं–नको " ची चौकशी केली. आज कांहीं नको

होतं. (मनांतून) सुटकेचा निश्वास सोडला. कोपऱ्यांतील मुठीची काठी हातीं घेतली आणि गांवाबाहेर मोकळचा माळावर आलो. तिथें माझी बसण्याची जागाहि मी निश्चित करून ठेवली होती. रस्त्यालगत एका कडुलिंबाच्या झाडाखाली पलीकडच्या शेताला लागून थोरली दगडी चटाण (बहुधा ती पटवाऱ्याच्या किंवा नझुलच्या मोजणीची) होती तीवर जाऊन बसलो. आज खरं सांगायचं म्हणजे शाळा सुटल्यापासून माझ्या मनांत "विद्यार्थ्यांची अभ्यासिका" हाच विषय घोळत होता. विद्यार्थ्यांनी तो आपल्या बुद्धीनुसार आपापल्या वह्यांतून लिहून काढला असेल; पण परीक्षक ह्या नात्याने मला पण ह्या विषयाची इष्ट ती माहिती असणें अगदीं अगत्याचे होतें.

मी माझ्या विद्यार्थीदशेंतील वेळेचा चित्रपट डोळ्यासमोर आणला. त्यावेळची माझी अभ्यासिका एका कोनाडयांत अगदीं उघडयावर होती. लहानसे भाडयाचें घर; त्या घरांत इतर माणसें-मुलबाळं. तेव्हां माझ्या एकटया करितांच स्वतंत्र अशी खोली किंवा कडी कुलपाचें कपाट कुठलें मिळायला ! त्यांत कशी बशी पुस्तकें कोंबायची आणि तिथंच खाली चटई अगर पोत्याच्या तुकडयावर बसून अभ्यास करावयाचा. पण एवढं खरं कीं अभ्यास करावयाचा तो मन लावून व परीक्षेंत वरच्या पांचापेक्षां कधीं खाली माघार घेतली नाही.

आजही अशाच अनेक गरीब व मध्यम स्थितींतल्या विद्यार्थ्यांची स्थिति आहे कीं ज्यांना स्वतंत्र अशा अभ्यासिकांची सोय नाहीं. तरीपण त्यांना मिळालेल्या टिचभर जागेंतहि व्यवस्थितपणा आणतां येईल. याबाबतींत आमच्या चाळींतील गोडबोल्यांचा अरविंद खरोखरीच आदर्श विद्यार्थी आहे. त्याला सुद्धां एका भाडयाच्या चाळींतील समोरच्या व्हरांडयाच्या भिंतींत असलेले तीन खणी कपाट व त्या समोरील जेमतेम ४×६ ची जागा मिळाली पण तेवढयाच कक्षेंत त्यानें आपलें बस्तान नीट बसविले आहे. कपाटालगतच्या भिंतीवर एक छोटेसे हनुमंताचें आणि दुसरे श्री समर्थ रामदासाचें. अशी दोन छाया चित्रें आहेत व त्याखाली:-

तनु त्यागितां कीर्ति मागें उरावी
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे
सदा सर्वदा सत्य वाचे वदावें.

अशा सारख्या सुंदर म्हणींचे चार पांच फलक आहेत.तदनंतर अभ्यास-क्रमाचा व दिनक्रमाचा अशी दोन टाईम टेबले त्यानें तेथें सुवाच्च अक्षरांत लावून ठेवली आहेत. व नुसते बोर्ड लावून ठेवलेले नसून त्याप्रमाणें तो कटाक्षानें त्याचें पालन करीत असतो. त्यांच्या दिनक्रमाच्या तक्त्यावरून स्पष्टपणें दिसून येते कीं तो पहाटे पांचाला उठून प्रातर्विधि आटोपून अभ्यासाला बसतो. त्यानंतर अवांतर वाचन; भावंडे आणि मित्र यांच्या बरोबर गप्पाविनोद, खेळ. इष्ट वेळीं भोजन नंतर शाळा. सायंकाळीं मैदानी खेळ व रात्री भोजनानंतर अभ्यास—त्यानंतर झोंप.

शाळेचें टाईमटेबल व दिनक्रमाचें वेळापत्रक याबरोबरच कपाटांत असलेल्या अभ्यासाच्या पुस्तक—वह्यांची यादी दर्शविणारा व त्यापोटींच इतर किरकोळ पण आवश्यक लागणाऱ्या वस्तूंची यादी ( कंपासची पेटी; पेन्सिल; रबर; टाक; शाईची दौत वगैरे) पण अेका बोर्डावर चिकटविली आहे.

पुस्तकें ठेवण्याची त्याची रीतसुद्धां वाखाणण्याजोगी आहे. शाळा सुरू होण्यापूर्वीं अगर सुरुवातीला त्यानें नवी किंवा सेकंडहॅंड पुस्तकें घेतलेली असोत; त्यांना सुंदर कव्हर लावून व जुन्या कॅलेंडरांच्या तारखा करून काापून ठेवलेले १–२–३–४ असे अनुक्रम नंबर डकवून ती पुस्तकें तो कपाटांत ठेवीत असतो. त्यामुळें त्याला कोणते पुस्तक कोणत्या ठिकाणीं आहे हें चटकन ओळखतां येते व लवकर सांपडते (नाहीतर कांहीं विद्यार्थी अेवढ्याच करतां घर डोक्यावर घेतात. धाकट्यांना धाकदपटशा दाखवतात अगर उगाचच आईच्या नांवानें ओरडतात.)

पुस्तकांची जी व्यवस्था तीच वह्यांची. अेवढासा डाग कुठं लागू न देण्याची दक्षता तो बाळगीत असतो. त्यानं अशा पुस्तक—वह्यांचा वर्षभर वापर केल्यानंतर परिक्षेनंतर ती निकालांत काढण्यासाठीं अेक नियमच (" फॉर्म्युला " हा शब्द विशेष शोभेल) करून टाकला आहे. नवें पुस्तक पहिल्या वर्षीं पाऊण पटीला विकायचे, दुसऱ्या वर्षी अर्ध्या किंमतीला व सेकंडहॅंड पुस्तक निम्म्या किंमतीला. वह्यांचा (निरर्थक) गठ्ठा तेवढा विक्रीस काढायचा. उपयुक्त नोटस् किंवा गणिताच्या रीति विषयींच्या वह्या मोठ्या

काळजीपूर्वक तो राखून ठेवीत असतो. न जाणो पुढल्या–त्याच्या पुढल्या वर्षी (मॅट्रिक पर्यंत) त्यांचे केव्हांतरी काम पडेल.

त्यानें तिमाही, सहामाही आणि वार्षिक परिक्षांचे जे पेपर मिळतात त्यांची वर्षवार व वर्गवार एक फाईल ठेवली आहे. त्यांचा त्यालाच नव्हे तर त्याच्या खालच्या वर्गातील अनेक विद्यार्थ्यांना उपयोग होतो. व " यंदा कोणते प्रश्न येतात " ही विवंचना साधारणत: अशा जुन्या पेपरांच्या संग्रहामुळें बऱ्याच अंशी कमी होते.पेपराबरोबरच परिक्षाचे तिमाही सहामाही व वार्षिक निकाल त्यानें जपून एका फाईलमध्ये टांचून ठेवले आहेत. त्याला आजहि मराठी चौथींत सहामाही व वार्षिक परिक्षेंत " तूं कोणता नंबर पटकाविलास " असें विचारले तर त्यावरून चटकन सांगता येते. इतकेंच नव्हे तर अमक्या सहामाहीत असलेले कच्चे विषय आपण कोणत्या उपायानें व मेहनतीनें पक्के करून वार्षिक परिक्षेंत वरचा नंबर पटकविला हे तो आजहि अभिमानानें सांगू शकतो. पुस्तकें व वह्याबरोबरच किरकोळ सामानहि व्यवस्थित ठेवण्याकडे त्याचें नेहमी लक्ष असते. साधी पेन्सिल–पण तिला व्यवस्थित टोंक असायलाच हवें. टांक व शाईची दौत नेहमी स्वच्छ असावयाची. चाकू किंवा ब्लेडही पण त्याचेजवळ तयार. वह्या शिवण्या वगैरेला एक सुई दोरा, एक कातर, जुन्या पण खराब न झालेल्या कव्हराचे पुठ्ठे, रबर, टांचण्या ह्या वस्तू पण तो मोठ्या काळजीपूर्वक वापरीत असतो. शाळेंत दररोज पुस्तकें घालून न्यावयाची पिशवी ठराविक ठिकाणीं तो खिळचावर टांगून ठेवतो व दर रविवारीं स्वत:च धुवून स्वच्छ करतो. " अग माझी पुस्तकांची पिशवी कुठं गेली " ही ओरड तो कधीच करीत नाहीं.

या शिवाय त्यानें आपल्याजवळ एक रोजनिशी ठेवलेली आहे. त्यांत तो आपल्या प्रत्येक दिवसाच्या दिनक्रमाचा आढावा घेत असतो. शिक्षकांनी सांगितलेले कांहीं उपदेशपर व वडिलधाऱ्या मंडळींचे आदेशहि त्यांत तो समाविष्ठ करीत असतो. त्याच्या रोजनिशींत शाळेला असलेल्या सुटचा (रविवार सोडून) संमेलनाच्या तारखा, त्यांतील कार्यक्रमांची व खेळांच्या प्रसंगांची नोंद आणि इतर बालवीरपथका वगैरेच्या कार्यक्रमासंबंधी सर्वच

गोष्टीची व्यवस्थित टिपणें असतात. त्याच्या दिनक्रम–वेळा–पत्रकावरून त्याच्या प्रात:सायंप्रार्थनेची वेळा व त्यावेळीं म्हणावयाचे श्लोक वगैरे ठरून गेलेले आहेत. आणि त्या तुटपुंजा अभ्यासिकेंतच सुटीच्या दिवशीं सोंगट्या, पत्ते व इतर बैठे खेळहि होत असतात. अरविंद निव्वळ पुस्तकी किडा (Book Worm) किंवा शरीराने किडकिडा नाहीं. अभ्यास आणि शरीर या दोन्हीहि विषयांकडे त्याचें सारखेंच लक्ष असते. त्याला यामुळेंच व्यवस्थितपणाचें बाळकडू मिळाले आहे आणि हे त्याच्या अभ्यासिकेंतील, इतर भिंतीवरील, त्याच्या शाळेंतील खेळांच्या वेळचे आणि घरी वापरण्याच्या कपड्यावरून दिसून येईल. साधी छत्रीच त्यानें खिळ्याला ठेवलेली आहे, पण ती तो दर आठवड्याला उघडून त्यावरील जाळे-जळमटे किंवा बसलेली धूळ उडवून पुन्हां नीट वंद करून व गुंडी लावून ठेवीत असतो. शाळेंतहि तो गुरुजनांशी मोठा विनयानें व विद्यार्थीबंधूंशी मोठ्या प्रेमानें वागतो.

मोकळ्या माळरानावर आतां संधिप्रकाशानंतरचा काळोख पडूं लागला होता. तेव्हा मी आपल्या जागेवरून उठून घराकडे वळलो. डोक्यांत अरविंदाच्या आदर्श अभ्यासिकेचें स्पष्ट व परिपूर्ण असे चित्र घोळत होते. आणि माझें मन मला सांगत होते कीं अशा एकेक कल्पनेनुसार त्या विद्यार्थ्याचे पेपर जर तपासले गेले तर त्याचा निकाल लावणें फारच सोपें होईल व अगदींच कच्च्या आणि गबाळ्या विद्यार्थ्याला किंवा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अरविंदाची अभ्यासिकाच दाखवून इष्ट ते मार्गदर्शन करतां येईल.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलम
अनुक्रम 32273 दि: 1.1.9.91
क्रमांक 73-7 नों दि: 7214

# १० : विद्यार्थी आणि प्रवासांतील वैशिष्टयें

गांधी विद्यालयाची रविवारीय वादविवाद सभा आमच्या शाळेचे एक वैशिष्टच म्हणून सांगतां येईल. शनिवारी सकाळी शेवटच्या तासाला आमचे पूज्य गुरूजी श्री. सोहनी विषय सुचवितात व त्यावर रविवारीं दुपारीं विद्यार्थ्यांचे परिसंवाद व खुद्द सोहनी गुरुजींचे समारोपाचे भाषण होत असते. त्यावेळी नुसते आमच्या शाळेचे विद्यार्थीच हजर असतात असें नाहींतर इतर शाळांचे कित्येक विद्यार्थी आणि कांहीं शिक्षकहि उपस्थित असतात. तेव्हां दोन ते पांच हे तीन तास कसे निघून जातात हें कळत सुद्धां नाहीं. विद्यार्थ्यांच्या परिसंवादापेक्षां सोहनी गुरू-जीच्या समारोपासाठींच प्रामुख्यानें एवढा श्रोतृगण जमत असतो.

विद्यार्थी जीवनांत प्रवासाचे किती महत्त्व आहे हें निराळे सांगणे नकोच. कालांतरानें आतां प्रवासपद्धतींत पुष्कळ फरक पडला आहे. आणि निरनिराळीं साधनें पण अस्तित्त्वांत आलेली आहेत. शिवाय क्रीडासंमेलनें, युवक महोत्सव विकास व औद्योगिक सफरी श्रमदानशिबिरें इत्यादि किती तरी योजना ह्या प्रवासांत आंखलेल्या असतात.

जुन्या काळीं देशोदेशीं हिंडून अंगच्या कलागुणांचा व वाक्पांडित्याचा चौफेर प्रभाव पाडला कीं बहुतांशी प्रवासाची इतिकर्तव्यता संपत होती. व

राजदरबारांत मानसन्मान होत होता. आतां जग अत्यंत झपाट्यानें बदलत आहे आणि प्रवासाच्या निरनिराळ्या योजना आंखल्या जात आहेत.

शालेय प्रवास किंवा सफरी प्रामुख्यानें पौराणिक ऐतिहासिक व निसर्ग–सौंदर्य–स्थलदर्शनासाठीं आंखण्यांत येतात व त्या शिक्षकांच्या मार्ग-दर्शनाखाली पार पडतात.

ठरल्याप्रमाणें रविवारी प्रथम विद्यार्थ्यांचे परिसंवाद झाले. बहुतेकांनी पूर्वी पाहिलेल्या कांहीं प्रसिद्ध शहरांचे तर कुणी आदर्श खेड्यांचे वर्णन केले. कित्येकांनी तदनुषंगाने अवलोकनांत येणारे पर्वत, नद्या, कालवे आणि कांहीं निसर्गरम्य स्थळासंबंधी माहिती सांगितली. शेवटीं टाळ्यांच्या कड-कडाटांत सोहनी गुरुजी बोलावयास उठले. ते आपल्या भाषणांत म्हणाले, " आतांपर्यंत विद्यार्थ्यांनी स्वत: केलेल्या प्रवासाची वर्णनें कथन केली. पण प्रवासाचे महत्त्व येथेंच संपत नाहीं. प्रवासाच्या अनुषंगानें कितीतरी गोष्टी आपणांस अनुभवावयास मिळतात. नवें जग पहावयास मिळते. अंगांतील कित्येक सद्‌गुणांना त्यापासून चालना मिळते. दररोजच्या त्याच त्या जीव-नाला कंटाळलेले मन असल्या प्रवासानें प्रसन्न व प्रफुल्लित होते. प्रवास म्हणजे एका गांवाहून नियोजित गांवाला जाणें व तिथून परत येणें नव्हे किंवा प्रवास वर्णनेंहि–आम्ही सकाळीं मोटारीनें निघालों; भाडे दर माणशीं दोन रुपये होते; बसमध्यें गर्दी फार होती. इष्ट स्थळीं आम्हांला पोंचायला तास दीड तास उशीर झाला. मोटारींतून उतरल्यानंतर तेथील सराईमध्यें आम्ही शिक्षकासह तळ ठोकला. दुपारचे जेवण व चार वाजतां चहा घेऊन आम्ही शहर पहाण्यास निघालो– अशा धर्तीची नसावीत; त्याकरितां आपण प्रवा-साची वैशिष्टयें प्रथम समजून घेतली पाहिजेत. प्रामुख्यानें आज मला प्रवासासंबंधी आपणाला जे सांगावयाचे आहे ते वैशिष्ट्यासंबंधी.

प्रवासाची योजना शिक्षक आणि विद्यार्थीजनांनी एकदां आंखली कीं तिच्यामध्यें परस्पर सहकार्याची एकभावना निर्माण व्हावयास हवी. तशीच एकजूट झाली पाहिजे. त्याबरोबरच शिस्त, आज्ञापालन आणि वक्तशीरपणा हे गुण प्रामुख्यानें अंगी बाणून घेतले पाहिजे. अशा रीतीनें आपण एकदां सुरवात केली म्हणजे प्रवासाच्या यशस्वितेचें अर्धें काम संपेल. आपण

नेहमीं पाहतोंच कीं उपरोक्त गोष्टींचे यथायोग्य पालन न झाल्यानें कित्ये-कदां सुरुवातीलाच प्रवासाचा विरस व क्वचित प्रसंगी विचका होऊन बसतो. बारा विद्यार्थी आणि चार शिक्षक, एकूण सोळा जणांची ' बॅच ' योजनेंत तयार झाली तरी निघण्याच्या स्थळीं म्हणजे शाळेत, बसस्टँडवर किंवा स्टेशनच्या आवारांत त्यापैकीं कित्येकांचा पत्ता नसतो. कित्येकांना विसर-लेल्या सामानाची आठवण होऊन घराकडे धांवपळ सुरू होते; किंवा कित्येक शिक्षकांच्या आज्ञा झुगारून वारा प्यालेल्या वासरांसारखे इतस्ततः भटकत असतात. त्यांत कित्येकांचीं बस किंवा गाडी चालूं व्हावयास लागली तरी शोधाशोध व धांवपळ चालूं असते. हे सर्व कटाक्षाने टाळले पाहिजे. आपल्या शिक्षकाच्या मार्गदर्शनाखालीं जो प्रवास व्हावयाचा असतो तो " सैनिकी " पद्धतीचा असला पाहिजे. सेनापति जो आदेश किंवा जे आदेश वेळोवेळीं सैनिकांना देतील ते जसे कांटेकोर व तंतोतंत पाळणें त्यांचे कर्तव्य ठरते अगदीं तसेंच विद्यार्थ्यांचे व्हावयास हवे.

प्रवासाच्या एकंदर योजनेचा अथपासून इतिपर्यंत जो कार्यक्रम आंखलेला असेल त्यांची एकेक प्रत सर्वांजवळ असावयास हवी व ती वारंवार चाळून पहाता येईल इतकी हाताशी किंवा खिशांतील नोटबुकांत असावी त्यामुळे निरर्थक चौकशी व वादविवाद टळतील. नियोजित प्रवासाची संपूर्ण नोंद ठेवण्याच्या दृष्टीने त्या दिवसांची तरी रोजनिशी प्रत्येकानें ठेवावयास हवी. प्रवासासाठीं घरून व शाळेंतील घेतलेल्या सामानाची यादीसुद्धां प्रत्येका-जवळ असावी. त्याचप्रमाणें पैशासंबंधीं प्रवासांत जरूर ती खबरदारी घ्याव-यास हवी. अगत्यापेक्षां जास्त पैसे जवळ बाळगावयाची हौस असल्यास ती टाळावी व जास्तीचे पैसे सरळ शिक्षकाजवळ आपली नोंद घेऊन ठेवावेत. म्हणजे पुढें—मागें कसलाहि धोका होणार नाहीं. कुठेंहि सामान चढवितांना किंवा उतरवितांना नीट तपासून घेत चलावें व घोळक्यानें किंवा समूहाने एकत्र येऊन काव्य-शास्त्र-विनोदात रंगलात तरी त्यांच्या मर्यादा लक्षांत ठेवाव्यात व सभोंवतील वातावरण नेहमीं निरखीत राहावें. आपल्या गोंगाटामुळें, बाष्कळ किंवा क्वचित प्रसंगी अश्लील वाक्प्रयोगामुळें कुणाची मनें दुखावली जाणार नाहींत याची खबरदारी घेणें अत्यंत आवश्यक आहे. आपले बसणें,

बोलणें व इतर हालचाली, स्नान, कपडे बदलणे (उघडयावर) वगैरे बारीक सारीक गोष्टींतहि विद्यार्थ्यांनी लक्ष असूं द्यावे.

आपल्या शिक्षकांनी आपल्यावर प्रवासांत सोंपविलेली कामेंसुद्धा योग्य रीतीने वक्तशीर प्रामाणिकपणें पार पाडावयास हवीत. प्रवासांत रोजनिशीचें जसे महत्त्व आहे त्याचप्रमाणें कॅमेऱ्याचे आहे व प्रवासास निघणाऱ्या बॅच बरोबर निदान एक तरी कॅमेरा हवाच. त्यामुळें प्रवासातील कितीतरी गोष्टी आणि सुंदर स्थळांची छायाचित्रें टिपून घेतां येतात. त्यांचा नंतर कुणाला प्रवास वर्णनें देतांना उपयोग तर होतोच पण आपल्या अनेक इष्ट मित्र-मंडळींना ती दाखवितां येतात, आणि कुणी निश्चयपूर्वक त्याचे आल्बम तयार करून ठेवले तर तो संग्रह भावी जीवनांतील नेहमींचा सन्मित्र ठरेल. प्रवासांतील भोजन, फराळ, चहा इत्यादि गोष्टींसंबंधीसुद्धां कांहीं नियम पाळणें आवश्यक आहे. कित्येक विद्यार्थ्यांना नुसत्या चहासाठीं एखाद्या हॉटे-लांत शिरतांना व शिरल्यावर नुसता हैदोस घालण्याची व सामान इकडे तिकडे करण्याची व ‘पानी लाव, चाय लाव’ म्हणून एकच गिल्ला कर-ण्याची फार वाईट खोड असते. आणि त्या ‘परठिकाणी’ (नवजागी) मार्ग-दर्शक म्हणून सोबत आलेल्या शिक्षकांना त्यांना आवरतांना मोठें कठीण जातें.

स्थलावलोकनांत पुराणवस्तु, इमारती, सरोवरें, नद्या, गुहा, टेकडया, डोंगर, कपारी, उद्यानें अजब वस्तुसंग्रहालये (Museums) लेणी इत्यादि कितीतरी बाबींचा समावेश करतां येईल. विद्यार्थ्यांनी ह्या सर्व अवलोकनांत सर्वांत जास्त संयम पाळावयास हवा. नाहींतर अेकादवेळीं कित्येक भयंकर गोष्टी घडतात. कांहीं सरोवर नद्यांत बुडलेले, तर कित्येक डोंगरांच्या उंच कडयावरून कोसळलेले, तर कित्येकांनीं अजब वस्तूसंग्रहातील वस्तूंची मोडतोड करून बसलेले असे अनेक प्रसंग सांगतां येतील व त्यामुळें शिक्ष-कांना व इतर विद्यार्थ्यांना भलताच त्रास व ताण पडतो. कित्येकवेळां योज-लेले प्रवास पूर्णपणें पार पडतातच असे नाही. कित्येकदां मधूनच परतावें लागते किंवा वाटेंतच तासनतास नव्हे तर संबंध दिवसरात्रसुद्धां खोळंबा होतो. अशा वेळीं सर्वांनी सहकार्यानें प्राप्त परिस्थितीचा अेकंदर आढावा

दा. क्र. ९२८५०

घेऊन शक्यतो मनोरंजक कार्यक्रम आंखावा व त्या प्रसंगातून पार पडतांच पुढील मार्गास लागावे. विद्यार्थ्यांनो; ओघांत मी अेक गोष्ट सांगावयास विसरलोंच कीं". असें हंसत हंसत सांगून सोहनी गुरुजी म्हणाले; "या प्रवासास निघालेल्या अनेक विद्यार्थ्यांपैकीं कोणी गायक, कवि, चित्रकार, वाद्यवृंदरसिक असे नानाविध रुचीचे मित्र असतील. त्यांनी प्रवासास निघतांना आपापल्या आवडीचे साहित्य अवश्य घेऊन निघावें; म्हणजे वाटेंत एखादा खोळंबा झाला किंवा दिवसभराचा श्रमपरिहार करण्यासाठीं, झोपेपूर्वी, अशा एकाद्या समूहानें या साधनांचा उपयोग करावा. भावगीतांचें गायन, फ्लूट किंवा बांसरी वाजविणें, प्रासंगिक विनोदाख्यायिका सांगून परस्परांस रिझविणें इत्यादि प्रकार या सदरांत येतील व अशा रीतीनें मजेमजेंत प्रवास करून आपणां सर्वांना मनाची प्रसन्नता वाढवितां येईल. व त्याच्या आठवणीने व मित्रमंडळीतील निवेदनानें तो आनंद ताजा ठेवतां येईल. सर्वांनीं या प्रसंगांची वर्णनें आपापल्या रोजनिशींत लिहिलेली असणार; त्यांपैकीं एखाद दुसराच लेखक-प्रवृत्तीचा विद्यार्थी शालेय हस्तलिखितांत किंवा प्रसिद्ध नियतकालिकांत लिहील. पण तेवढ्याने काम भागणार नाहीं. आपण सर्वांनीं त्या नोंद वह्या ( शिक्षक आणि विद्यार्थी दोघांच्याहि मिळून ) प्रवासाहून परत आल्यानंतर योग्य नियंत्रणाखालीं आपल्या शाळेंत प्रदर्शनाच्या रूपानें ठेवाल व त्याला आपल्यांतील छायाचित्रकारानें संकलित केलेल्या चित्रांची जोड द्याल तर त्याचा फायदा आपणाला आपल्या शाळेतील सर्व शिक्षकवर्गांना व विद्यार्थ्यांना मिळू शकेल. आणि या सर्व रोजनिशींतून नोंदले गेलेलें विविध वाङ्मय वाचून अनेकांचे मनोरंजन होईल.

माझ्या कल्पनेनुसार मी हीं प्रवासासंबंधीं ध्यानांत ठेवण्यासारखी वैशिष्टचें सांगितलीं आहेत; आणि कांहीं इतरहि सांगतां येण्यासारखी आहेत; पण तूर्त एवढींच असूं द्यात. इतक्यांचेच जरी आपणांकडून पालन झाले तरी मला समाधान वाटेल "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रमांक:
अनुक्रम 32293 दि. 1/7/04
क्रमांक 93.07 नों. दि. 21/21/04

## श्री. वि. वा. जोशी यांचीं प्रकाशित पुस्तकें

मराठी

(१) लोककथा व लोकगीतें
(२) चंद्रपुरी लोककथा
(३) पंचमहाल
(४) वनांतील मनें
(५) माझे लेख
(६) रडया रंगेल
(७) तिळगुळ
(८) भक्ति गीत
(९) विनोदी कळया
(१०) चंद्रपूरची महाकाली
(११) वन्य पशूंच्या मौजा
(१२) लघुनिबंध

हिंदी

(१३) देखीं दुनिया

इंग्रजी

(१४) इन् द् स्मोक जोक
(इंग्रजी कविता)

आगामी

(१) नागपुरी नळ (लघुकथा संग्रह)
(२) अमूर्त प्रेम (कादंबरी)
(३) शिकार–कथा (शिकार)
(४) हंसरे गुलाब (विनोदी)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 32293 दि.
क्रमांक 93.59 नों. दि.

REFBK-0011490

# आमचीं ललित प्रकाशनें

| | | |
|---|---|---|
| रिकामा देव्हारा | ३.५० | वि. स. खांडेकर |
| दीपमाळ | २.०० | शं. रा. देवळे |
| लवणाची मासोळी | ४.५० | ल. म. भिंगारे |
| विदुषी | १.५० | ना. धों. ताम्हनकर |
| मायणीची मंजुळा | ४.०० | ह. श्री. शेणोलीकर |
| आदर्श विद्यार्थी | १.०० | वि. वा. जोशी |
| एकसष्टी | १.७५ | ना. धों. ताम्हनकर |
| प्राचीन भारतीय संस्कृति | ७.५० | स. का. दीक्षित |
| सांख्यदर्शन | १.०० | श्रीनिवास दीक्षित |

दा. ना. मोघे प्रकाशन, कोल्हापूर